वर्ष- १० | अंक- २७ | मुंबई, मंगळवार, २१ मे ते २७ मे २०२४ | पृष्ठ-४

ठाणे आवृत्ती

मराठी साप्ताहिक

R.N.I. No. MAHMAR/2014/60133

मूल्य २/- रुपये

POSTAL REGISTRATION No.PLG/205/2022-2024

# पोलीस बातमी पत्र

POLICE BATMI PATRA

संपादक : दिपक मोरेश्वर नाईक

www.policebatmipatra.in | policebatmi | police batmi patra | policebatmipatra | policebatmipatra@gmail.com

PG 2 कमी किमतीत डॉलर देण्याच्या बहाण्याने फसवणूक करण्याचा प्रयत्न

3 → शेअर बाजारात भारताचा गोंधळ....

या '3' घरगुती फ्रूट मास्कने करा सनटॅनच्या समस्येला अलविदा! ← 4

## खुनाच्या गुन्ह्यातील पसार गुन्हेगारास २७ वर्षानंतर अटक



भाईंदर - २७ वषार्पासुन खुनाच्या गुन्ह्यांत फरारी असलेल्या आरोपीस अटक करण्यात गुन्हे शाखा कक्ष- १, काशिमीरा यांना यश.अधिकमाहीती नुसार दिनांक ०५/१०/१९९७ रोजी सकाळच्या सुमारास भाईंदर पूर्व एम. आय. उद्योगनगर, वासुदेव इंडस्ट्रीयल इस्टेट, गाळा नं. बी / १५, येथे विजयसिंग व त्याचे दोन साथीदार रा. साईसागर बिल्डींग, रुम नं. २१६, सी विंग, भाईंदर यांनी गटारात प्लास्टीक पिवशीतुन बिल्डींगवरुन कचरा टाकला त्यामुळे प्रमोदकुमार पांडे व त्यांचे साथीदार यांच्या अंगावर खराब पाणी उडवले व त्या वरुन त्याच्यामध्ये बोलाचाली व धक्काबुक्की झाली व त्याच दरम्यान धरमनाथ रामशंकर पांडे यांच्या डोक्यात बांबुचा फटका मारुन जबर दुखापत करुन जिवे ठार मारले म्हणुन फियादी श्री. प्रमोदकुमार सुताराम पांडे वय २४ वर्ष, धंदा नोकरी, रा. गाळा नं. १४ /ए, एम. आय. उद्योग, वासुदेव इस्टेट अभिनव विद्या मंदीर समोर, केबीन क्रॉस रोड, भाईंदर (पु.) यांनी दिलेल्या तक्रारी वरुन भाईंदर पोलीस ठाणे येथे गुन्हा दाखल करण्यात आलेला होता. सदर गुन्हयांचे मा. न्यायालयात दोषारोप पत्र दाखल करण्यात आलेले असुन त्याचा सेशन केस नं. १०/१९९८ असा आहे.

सदर गुन्हयातील आरोपी १) विजयिसगं श्रीरामचंद्र चौहाण रा. नर्मदा कुंज ए/२०९, सीी वगं , कॅबीन रोड, भाईंदर पर्वु . मुळ रा. गांव जबकीबलेपुर पो. गोपालपरु तो, टनलगंज जि. आझमगढ, राज्य यु.पी. पोस्टे मेहनगर यांस दिनांक ०५/१०/१९९७ रोजी अटक करण्यात आली होती . सदर गुन्हयांत १) मेवालाल ऊर्फ पन्नालाल मुरत चौहाण मुळ रा. गांव नोनरा, ता. लालगंज पो. स्टेशन मेहनगर जि. आजमगढ, २) राजेंद्र रामदुलार पाल रा. गाव पोस्टे हिलया पो. लालंगज, जिल्हा मिर्झापुर (यू.पी.) (संशयीत) हे फरार आरोपी असून मिरा-भाईंदर, वसई-विरार पोलीस आयुक्तलयातील गंभीर व क्लिष्ट स्वरुपांचे खुनाच्या गुन्हयांतील या आरोपींचा शोध घेण्याबाबत बाबत मा. पोलीस आयुक्त सो यांनी पोलीस पथकास आदेशीत केले होते. त्यानुसार गुन्हे शाखा कक्ष- १, काशिमिराचे अधिकारी व अंमलदार यांचे तपास पथक सदर गुन्ह्यांतील आरोपी यांचा शोध घेत होते. तपासात सदर गुन्हयातील फरार आरोपी मेवालाल ऊर्फ पन्नालाल मुरत चौहाण यांचा त्याच्या राहत्या पत्यावर शोध घेत असतांना पो. हवा. पुष्पेंद्र थापा यांचे गुप्त बातमीदार यांनी माहीती दिली कि, आरोपी मेवालाल ऊर्फ पन्नालाल मुरत चौहाण हा सध्या दिल्ली येथे रहात आहे. त्या अनुशंगाने आरोपी याची माहीती प्राप्त करुन मेवालाल ऊर्फ पन्नालाल याचा शोध घेतला असता तो दिल्ली येथे मिळुन आला आहे. त्यास दिनांक १२/०५/२०२४ रोजी ताब्यात घेण्यात आले. पोलिसांनी आरोपी पन्नालाल राममुरत चौहाण यांचेकडे केलेल्या चौकशीमध्ये आरोपीने गुन्हा केल्याचे तपासात निष्पन्न झाले आहे. आरोपी याचा मा. मेट्रोपोलीटन मॅजीस्ट्रेट, नॉर्थ ड्रिस्ट्रीक्ट रोहीणी कोर्ट, नवी दिल्ली यांचे न्यायालयातुन ट्रान्झीट रिमांड घेवुन आरोपीस पुढील कारवाई कामी भाईंदर पोलीस ठाणे येथे हजर करण्यात आलेले आहे.

सदरची कामगीरी मिरा-भाईंदर, वसई-विरार पोलीस आयुक्तालयाचे मा. श्री. अविनाश अंबुरे, पोलीस उप-आयुक्त गुन्हे, मा. श्री. मदन बल्लाळ, सहा. पोलीस आयुक्त सो, गुन्हे शाखा, यांचे मागर्दशर्नाखाली गुन्हे शाखा कक्ष १ काशिमीरा येथील पो.नि. अविराज कुराडे, स.पोि.नि.प्रशांत गांगुर्डे, स.पो. नि. पुष्पराज सुर्वे, पोलीस उपनिरीक्षक राजु तांबे, सहाफौज संदीप शिंदे, पो. हवा./पुष्पेंद्र थापा, पो.हवा. अविनाश गर्जे०, पोहवा / सुधीर खोत, पो. हवा./ सचिन हुले मसुब किरण असवले, सपोउपिनरी संतोष चव्हाण, सायबर विभाग यांनी केली आहे.

## चिमुकल्याच्या अपहरणप्रकरणी आणखी एका महिलेस बिहारमधून अटक

### ५ महिन्यांच्या बाळाची सुखरूप सुटका

**उल्हासनगर** : शहरातील झुलेलाल मंदिरासमोरील भिकाऱ्याच्या ५ महिन्यांच्या चिमुकल्याचे अपहरण करून तिच्याकडून दोन लाख रुपयांची खंडणी मागणाऱ्या दोन महिलांना उल्हासनगर पोलिसांनी अटक केली. त्यांच्या तावडीतून बालकाची सुखरूप सुटका केली आहे. पोलिसांनी एका अपहरणकर्त्याला हैदराबादमधून तर दुसऱ्याला बिहार राज्यातील नक्षलग्रस्त भागातून अटक केली आहे.

उल्हासनगरच्या झुलेलाल मंदिरासमोर भीक मागणाऱ्या एका महिलेचे ५ महिन्यांचे बाळ आरोपींनी अपहरण करून तिच्याकडे २ लाखांची मागणी केली होती. यापूर्वी उल्हासनगर पोलिसांच्या एका विशेष पथकाने हैदराबाद येथून सोनी पासवान नावाच्या महिलेला अटक केली होती. तसेच या घटनेतील दुसरी आरोपी महिला ही बाळाला घेऊन बिहार येथे फरार झाल्याचे तपासात निष्पन्न झाल्यावर पोलीस उपायुक्त डॉ.सुधाकर पठारे, सहाय्यक पोलीस आयुक्त अमोल कोळी, वरिष्ठ पोलीस निरीक्षक विष्णू ताम्हाणे यांच्या मार्गदर्शनाखाली पोलिसांचे एक पथक बिहार येथे रवाना करण्यात आले होते. बिहार येथील भागलपूर जिल्ह्यातील भाकरपूर गावातून स्थानिक पोलिसांच्या मदतीने मालादेवी राजक या महिलेला सापळा रचून अटक करण्यात आली. तसेच अपहरण झालेल्या बाळाला सुखरुप ताब्यात घेऊन तिच्या आईच्या स्वाधीन करण्यात आले. पोलीस ठाण्याचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक विष्णू ताम्हाणे यांनी सांगितले की, स्वाती सहदेव बेहरा, कृष्णाताई सुरक्षादेवी, संतोषी रेड्डी आणि सुनीता यांचा या गुन्ह्यात सहभाग असून, अद्याप काही जण फरार आहेत.

बिहारमध्ये कारवाईसाठी गेलेल्या महिला पोलीस अधिकारी निकिता भोईगड यांनी सांगितले की, आरोपी महिला मुलाला घेऊन नक्षलवाद्यांचा परिसर असलेल्या बकरपूर गावात गेली होती. गावाचे नाव ऐकल्यावर एकही वाहनचालक तिकडे जायला तयार नव्हता. त्यासाठी दुप्पट भाडे मोजावे लागले. बकरपूर गावात जाण्यासाठी आरोपी महिलेला पीरपथी गावातून जावे लागते. दोन्ही भागांतील लोक गुन्हेगारी प्रवृत्तीचे आहेत. या महिलेला ताब्यात घेण्यासाठी पोलीस गेले असता, गावातील शेकडो लोकांनी त्यांना घेराव घातला. अथक प्रयत्नानंतर पोलिसांना आरोपी महिलेला ताब्यात घेण्यात यश आले.

## घरफोडी करणाऱ्या त्रिकुटाला अटक

**भिवंडी**: घरफोडीच्या दोन वेगवेगळ्या घटनांमधील त्रिकुटाला बेड्या ठोकण्यात गुन्हे शाखेला यश आले आहे.कैफ इसरार सिद्धीकी (१९),अंकीत तेनाराम गुप्ता (१९),मोहमद सैफ जावेद खान (२९) अशी अटक केलेल्यांची नावे आहेत.त्यांच्याकडून ७ गुन्ह्यांची उकल झाली.यात ३ लाख १५ हजार रुपयांचा मुद्देमाल हस्तगत करण्यात आला आहे. भिवंडीतील वाढत्या घरफोडी चोरीच्या गुन्ह्यांच्या अनुषंगाने विशेष पथक तयार करून गुन्हे उघडकीस आणण्याचे आदेश वरिष्ठांनी दिले होते.त्यानुसार सुरू असलेल्या समांतर तपासात पोशि अमोल इंगळे यांना वरील तिघा आरोपींची नावे निष्पन्न झाली. दरम्यान भिवंडीचे वपोनि योगेश आव्हाड यांच्या मार्गदर्शनाखाली सपोनि श्रीराज माळी,धनराज केदार, पोह अमोल देसाई, प्रकाश पाटील, देवानंद पाटील, किशोर थोरात,पोना सचिन जाधव,पोशि उमेश ठाकुर, भावेश घरत, सचिन सोनावणे, नितीन बैसाणे आदि पोलिस पथकाने शनिवारी १८ मे रोजी छापा कारवाईत तिघांना अटक केली.

## पैसे कमवण्यासाठी मूर्तिकार बनला चोर

**कल्याण** : झटपट पैसे कमवण्याच्या हव्यासापोटी मूर्तिकाराने चोरीचा मार्ग पत्करला. मात्र लोकल ट्रेनमध्ये चोरी करतांना रेल्वे पोलिसांनी त्याला बेड्या ठोकल्या. दिनेश धुमाळ असे त्याचे नाव असून त्याच्यावर विवीध पोलीस ठाण्यात गुन्हे दाखल असल्याची माहिती कल्याण रेल्वे पोलिसांनी दिली. टिटवाळ्याला राहणारा दिनेश धुमाळ हा मूर्तिकार आहे. उत्तम मूर्ती घडविण्याचे काम तो करायचा. परंतु त्याला पैशांची गरज होती. मूर्ती घडवण्याच्या कामातून पैसे मिळत नसल्याने लवकर पैसे कमवण्यासाठी त्याने चोरीचा मार्ग पत्करला. यातून रेल्वेमध्ये लहानमोठ्याचोरी करण्यास सुरुवात केली. वाशिंद रेल्वे स्थानकात लोकल सुरु होताच दारातील महिलेची चेन हिसकावून तो फलाटावर उतरला आणि पळ काढला.

## लग्नाच्या आमिषाने चुलत बहिणीवर अत्याचार

### पीडितेचा गर्भपात, बापलेकावर गुन्हा दाखल

**भिवंडी**: भावा-बहिणीच्या पवित्र नात्याला काळिमा फासणारी धक्कादायक घटना भिवंडीतून समोर आली आहे.याप्रकरणी बापलेकावर शहर पोलिस ठाण्यात अत्याचारासह पोक्सोन्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे.



भिवंडीतील शहर पोलिस ठाणे हद्दीत राहणाऱ्या एका २० वर्षीय नराधम चुलत भावाने त्याच्या १५ वर्षीय चुलत बहिणीला लग्नाचे आमिष दाखवून तिला १० महिने आपल्या वासनेचा बळी बनवला, एवढेच नाही तर मुलगी गरोदर राहिल्यानंतर तिला नराधम मुलाच्या ४५ वर्षीय बापाने गर्भनिरोधक गोळ्या देऊन पीडीतेचा गर्भपात केला.याप्रकरणी पीडितेच्या आईच्या तक्रारीवरून भिवंडी शहर पोलिसांनी आरोपी मुलगा आणि वडिलांविरुद्ध पॉक्सोसह विविध कलमांतर्गत गुन्हा दाखल केला असून पोलिसांची कुणकुण लागल्याने आरोपी मुलासह त्याचा बाप फरार झाले आहेत. भिवंडी परिसरात राहणाऱ्या एका १५ वर्षीय तरुणीला तिच्या चुलत भावाने लग्नाचे आमिष दाखवून तिच्या भिवंडीतील घरात १० फेब्रुवारी ते ३० नोव्हेंबर २०२३ पर्यंत वारंवार बलात्कार केला.त्यामुळे पीडित मुलगी गर्भवती राहिली दरम्यान पीडिता गर्भवती राहिल्याचे मुलाने बापाला सांगितले.त्यानंतर बापाने पीडितेला गर्भनिरोधक गोळ्या देऊन तिचा गर्भपात केला.दरम्यान याबाबत माहिती मिळताच पीडितेच्या आईच्या तक्रारीवरून भिवंडी शहर पोलिसांनी बापलेकाच्या विरोधात भादंवि कलम ३७६ (२) आणि पॉक्सो कायद्यान्वये गुन्हा दाखल केला आहे.पोलिस फरार आरोपी बापलेकाचा शोध घेत आहेत.

## तरुणीवर ज्वलनशील पदार्थ टाकून चोरटे फरार

**कल्याण** : यूपीएससी परीक्षेची तयारी करणाऱ्या तरुणीवर ज्वलनशील पदार्थ टाकून तिच्या जवळील लॅपटॉप हिसकावून दोन चोरटे पसार झाल्याचे घटना कल्याण पूर्वेत घडली. या घटनेत तरुणी किरकोळ जखमी झाली असून कोळसेवाडी पोलीस दोन चोरट्यांचा शोध घेत आहेत. तरुणी कल्याण पूर्वेतील लोकग्राम परिसरात राहणाऱ्या मित्राला लॅपटॉप देण्यास आली होती. रेल्वे स्टेशन जवळील पार्किंगमध्ये ती आली असता, दोन अज्ञात व्यक्ती तिच्याजवळ आले. त्यांनी तिच्या अंगावर अचानक ज्वलनशील पदार्थ टाकला. घाबरून तिने डोळे मिटले. त्यामुळे इजा टळली. मात्र तिच्या अंगाची आग सुरू झाली.

## घरफोडी करणाऱ्या गुन्हेगाराला अटक

### चोरी केलेला सुमारे २ लाखांचा मुद्देमाल पोलिसांनी केला हस्तगत

**मीरा रोड** : भाईंदर पश्चिमेला एका दुकानाची भिंत पाडून रात्री घरफोडी करणाऱ्या सराईत गुन्हेगाराला भाईंदर पोलिसांनी अटक केली आहे. गुन्ह्यात चोरी केलेले ३५ मोबाइल फोन, ७ स्मार्ट वाच असा एकूण २ लाख ३२ हजार रुपये किमतीचा मुद्देमाल हस्तगत केला आहे.

भाईंदर पोलीस ठाणे हद्दीतील एका दुकानाची मागील भिंत तोडून कोणीतरी अज्ञात चोरट्याने दुकानातील नवीन मोबाईल, स्मार्ट वाच, ब्लू टूथ, रिपेअरिंगसाठी आलेले जुने मोबाईल, गल्ल्यातील रोख रक्कम २७ एप्रिल रोजी चोरी केली. याप्रकरणी अज्ञात चोरट्याविरुद्ध भाईंदर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला होता. हा गुन्हा घरफोडीचा गंभीर स्वरुपाचा असल्याने वरिष्ठांनी दिलेल्या सूचनांप्रमाणे गुन्ह्याचा तपास सुरू करण्यात आला होता. तपासादरम्यान गुन्ह्याच्या



घटनास्थळाचे व इतर ठिकाणचे सीसीटीव्ही कॅमेऱ्याचे फुटेज तपासले. त्यात एक संशयित व्यक्ती दिसला. त्याचे फोटो काढून माहिती घेतली. आरोपी हा तपस ऊर्फ टायसन असून तो डेक्कन रोड, फुटपाथ, मुंबई परिसरातील फिरस्ता असल्याची माहिती मिळाली. त्यानुसार त्याठिकाणी सापळा रचला. दोन दिवस पाळत ठेवून आरोपीला ताब्यात घेतले. त्याचे नाव तपस ऊर्फ टायसन जुगलचंद उरवी (४२, रा. दोन टाकी, डेक्कन रोड, फुटपाथ, मुंबई) असे आहे. त्याने गुन्हा केल्याचे निष्पन्न झाल्याने त्याला अटक करण्यात आली. अटक आरोपीकडे पोलीस कोठडीदरम्यान तपास केला असता त्याने गुन्ह्यात चोरी केलेले रिपेअरिंगसाठी आलेले जुने मोबाईल फोन व स्मार्ट वॉच हे त्याने मुंबईतील चोर बाजारात विक्रीला दिले होते. तसेच नवीन मोबाईल फोन आरोपी अब्दुल रहीम खलील शेख (रा. मुसाफिर खाना मस्जिद बंदर, मुंबई) याला विकले. आरोपीने ते मोबाईल कोलकाता येथे विक्रीस त्याच्या भावाचे नावे कुरियरने पाठवले. गुन्ह्यात चोरी केलेले ३५ मोबाइल्स फोन, ७ स्मार्ट वाच असा एकूण २ लाख ३२ हजार रुपये किमतीचा मुद्देमाल हस्तगत करण्यात भाईंदर पोलीस गुन्हे प्रकटीकरण पथकाला यश आले आहे. अटक दोन्ही आरोपी हे सध्या न्यायालयीन कोठडीत आहेत.

## घरफोडी करणाऱ्या गुन्हेगाराला अटक

**मीरा रोड** : भाईंदर पश्चिमेला एका दुकानाची भित पाडून रात्री घरफोडी करणाऱ्या सराईत गुन्हेगाराला भाईंदर पोलिसांनी अटक केली आहे. गुन्ह्यात चोरी केलेले ३५ मोबाईल फोन, ७ स्मार्ट वाच असा एकूण २ लाख ३२ हजार रुपये किमतीचा मुद्देमाल हस्तगत केला आहे. भाईंदर पोलीस ठाणे हद्दीतील एका दुकानाची मागील भिंत तोडून कोणीतरी अज्ञात चोरट्याने दुकानातील नवीन मोबाईल, स्मार्ट वाच, ब्लू टूथ, रिपेअरिंगसाठी आलेले जुने मोबाईल, गल्ल्यातील रोख रक्कम २७ एप्रिल रोजी चोरी केली. याप्रकरणी अज्ञात चोरट्याविरुद्ध भाईंदर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला होता. हा गुन्हा घरफोडीचा गंभीर स्वरुपाचा असल्याने वरिष्ठांनी दिलेल्या सूचनांप्रमाणे गुन्ह्याचा तपास सुरू करण्यात आला होता.

## टेम्पोच्या धडकेत दुचाकीस्वाराचा मृत्यू

**कल्याण**: कल्याणमध्ये टेम्पोच्या धडकेत दुचाकीस्वाराचा मृत्यू झाल्याची घटना घडली आहे. शुक्रवारी रात्री साडे दहाच्या सुमारास कल्याण पूर्वेतील काटेमानिवली पुलावर हा अपघात घडला. टाटा कंपनीच्या आयशर टेंपोने किशन गुप्ता यांच्या दुचाकीला जोरदार धडक दिली. यामध्ये पुलाच्या संरक्षक कठड्याला आदळल्याने त्याचा जागीच मृत्यू झाला. याप्रकरणी टेंपो चालक रामभरत गौड याच्याविरुद्ध कोळसेवाडी पोलीस ठाण्यात निष्काळजीपणे वाहन चालवून अपघात केल्याचा गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

## ट्रक चालकावर जीवघेणा हल्ला



**डोंबिवली** : हमालाला ट्रक मधील माल उतरवायचे काम दिले नसल्याच्या रागातून एका ट्रक चालकावर जीवघेणा हल्ला केल्याची घटना डोंबिवलीत घडली .जखमी ट्रक चालकावर याप्रकरणी गुन्हा दाखल करण्यात आला असून विष्णू नगर पोलिसांनी अक्षय कारंडे या आरोपीला अटक केली असून दुसरा आरोपी विशाल पानवलकर हा पसार झाला असून पोलीस त्याचा शोध घेत आहेत.

डोंबिवली पश्चिमेतील कोपर रोड परिसरात सिद्धाई या इमारतीचे प्लास्टरचे काम सुरु होते. त्यासाठी लागणारे बांधकाम साहित्य घेवून एक ट्रक आला होता. हा माल इमारतीसमोर उतरवण्याचे काम सुरु होते. त्यावेळी त्याठिकाणी दोघे जण तेथे आले. त्यांनी ट्रक चालक बालाजी कोपनर याला गाडीतून खाली उतरवले .आमच्या परिसरात येवून माल उतरवण्याचे काम करतो. आमच्या हमालांना माल उतरवण्याचे काम का दिले नाही ? तुला कोणी सांगितले ? असे विचारले. त्यावेळी ट्रक चालकाने मी माझं काम करतो आहे .उगाच माझ्याशी वाद कशाला घालता ? असे उत्तर दिले. त्यामुळे संतप्त झालेल्या आरोपींनी ट्रक चालकास मारहाण केली.

## बेसुमार मासेमारी रोखण्यासाठी कायदा करणार

**पालघर** : बेसुमार पद्धतीने मासेमारी होऊ नये, यासाठी पर्ससीन एलईडी बोटीना कायद्याच्या चौकटीत बसवण्यात येत आहे. अवैध पद्धतीने मासेमारी करणाऱ्यांवर पूर्ण नियंत्रण आणण्यासाठी सरकारने या दृष्टीने योजनेसाठी मंजुरी दिल्याचा मला विश्वास आहे. यामुळे अशा पद्धतीने मासेमारी करणाऱ्यांवर जरब बसेल व पारंपरिक पद्धतीने मासेमारी करणाऱ्यांना त्याचा फायदा होईल, असा विश्वास मत्स्य व्यवसायमंत्री सुधीर मुनगंटीवार यांनी शिरगाव येथे पत्रकारांशी बोलताना व्यक्त केला.

सिल्वर पापलेटला राज्य माशाचा दर्जा दिला आहे. त्याचे संरक्षण व्हावे त्यासाठी आतापर्यंत समुद्रात साधारण १२० आर्टिफिशल रीगचा उपयोग करण्यात आला आहे. पालघरमध्येही मोठ्या प्रमाणात हा मासा मिळतो. या माशाचा दुष्काळ होता कामा नये. आज हा मासा नष्ट होण्याच्या प्रजातीत नसला तरी भविष्यात आपण काळजी घेतली नाही तर याठिकाणी विशेष करून सिल्वर पापलेटबाबत ही नष्ट होण्याची भीती भविष्यात आपण नाकारू शकत नाही, असेही मुनगंटीवार यांनी स्पष्ट केले.



मासेमारी बंदी करण्याविषयी आमच्या आमदाराचे दोन गट आहेत. काही आमदारांचे म्हणणे आहे चालू द्या. तर काही आमदारांचे म्हणणे आहे. या पद्धतीची मासेमारी बंद करा, आपण काही सांगितल्यास तामिळनाडू राज्याचे उदाहरण व जपानचे उदाहरण त्यांच्याकडून देण्यात येत आहे. पावसाळ्यातील मासेमारी बंदीचा काळ वाढवण्यासंबंधी ही दोन मतप्रवाह आहेत, असे मुनगंटीवार म्हणाले. ते पुढे म्हणाले, येथील मच्छीमारांचे म्हणणे आहे की, मासेमारी बंदीचा काळ वाढवावा, पण इतर ठिकाणच्या मच्छीमारांचे म्हणणे आहे तोच ठेवावा. सर्व मच्छीमारांचा विचार केला तर नऊ राज्य व चार केंद्रशासित प्रदेशांना समुद्रकिनारा आहे. त्यांची एक धोरण ठरवले पाहिजे. जेणेकरून मच्छीमारांचे नुकसान होणार नाही. त्यांना त्याचा फायदा होईल. राज्यात राम नाईकांच्या नेतृत्वाखाली एक समिती गठित करण्यात आली होती. त्यांना या भागातील मच्छीमारांचा अनुभव होता. वयोमानाने त्यांना काही अडचणी येत आहेत. त्यामुळे उपाध्यक्ष व कार्याध्यक्ष त्या समितीवर नेमून वेगाने कामे होतील, या दृष्टीने विचार सुरू असल्याचे त्यांनी सांगितले. आम्हाला अपेक्षा होती. अहवाल लवकर येईल, पण त्याला उशीर होत आहे. महाराष्ट्र हे पुरोगामी राज्य असल्याने मच्छीमारांच्या दृष्टीने सोयीचे धोरण तयार करून त्याचा उपयोग इतर राज्यांसाठी केंद्र सरकारनेही करायला हवा. यासाठी प्रयत्नशील असल्याचे मुनगंटीवार यांनी यावेळी सांगितले.

मी या पदावर आल्यानंतर अनेक वर्षापासून थकलेला मच्छीमारांचा ५०० कोटी रुपयांचा डिझेल परतावा त्यांना देण्यात आला. डीपीडीसीमध्ये साधारण छोट्या जेट्टीमधला गाळ साफ करण्यासाठी ५ कोटींची तरतूद करण्यात आली. गस्ती नौका अगोदर भाड्याने होत्या. आता सहा गस्ती नौका घेण्याची परवानगी वित्त विभागाकडून घेत आहोतॉ, असे सांगत अवैध पद्धतीने मासेमारी करणाऱ्यांवर जरब बसवण्यासाठी लोकांचा सहभाग वाढवण्याची आवश्यकता आहे. यासाठी कायद्यात तरतूद करून शिक्षा वाढवणे, दंड वाढवणे अशा प्रकारचा उपाययोजना कराव्या लागणार आहेत, असेही मुनगंटीवार यांनी यावेळी सांगितले.

# पोलीस बातमी पत्र

मुंबई

२

मुंबई, मंगळवार, २१ मे ते २७ मे २०२४


# कमी किमतीत डॉलर देण्याच्या बहाण्याने फसवणूक करण्याचा प्रयत्न

## त्रिकूट अटकेत




**नवी मुंबई** : कमी किमतीत अमेरिकन डॉलर देण्याच्या बहाण्याने वाशीतील एका व्यावसायिकाला लुबाडण्याच्या प्रयत्नात असलेल्या त्रिकुटाला सानपाडा पोलिसांनी सापळा लावून अटक केली आहे. पोलिसांनी या त्रिकुटाकडून २० डॉलरच्या दोन नोटा लावलेले कागदी बंडल व एक मोबाईल फोन जप्त केला आहे. या त्रिकुटाने अशाच पद्धतीने अनेक लोकांची फसवणूक केली असण्याची शक्यता असल्याने पोलिसांकडून त्यांची कसून चौकशी करण्यात येत आहे.

या प्रकरणात अटक करण्यात आलेल्यांमध्ये मोफाजूल अबुल शेख (४०), मेहबूब आपू शेख (३३) व मासूद आलम उस्मान गनी (३३) अशी या तिघांचा समावेश असून, हे तिघेही कामोठे येथील नौपाडा गावात राहण्यास आहेत. यातील मेहबूब शेख याने गत ५ मे रोजी वाशीमध्ये कपडे विक्रीचा व्यवसाय करणारे मयुर मंगे यांच्या मोबाईलवर संपर्क साधून त्याने यापूर्वी त्यांना आंबे विक्री केल्याचे सांगितले. तसेच त्याच्या मावशीला अमेरिकन डॉलरचे बंडल सापडले असून, ते तिला भारतीय चलनामध्ये बदलून हवे असल्याचे तसेच सदरचे डॉलर हे कमी किमतीत देणार असल्याचे देखील त्याने मंगे यांना सांगितले. दरम्यान, कमी किमतीत अमेरिकन डॉलर देण्याच्या बहाण्याने अनेक व्यावसायिकांची फसवणूक झाल्याची माहिती मयुर मंगे यांना असल्याने त्यांनी सदरचे डॉलर विकत घेण्याचा बहाणा केला. तसेच मेहबूब शेख याला १२ मे रोजी सायंकाळी त्यासाठी भेटण्याचे कबूल केले. त्यानंतर मयुर मंगे यांनी सानपाडा पोलीस ठाण्याचे वपोनि. विजयकुमार पन्हाळे यांची भेट घेऊन त्यांना याबाबतची माहिती दिली. त्यानंतर पन्हाळे यांनी या आरोपींना पकडण्यासाठी रविवारी सायंकाळी सानपाडा सेक्टर-५ मध्ये सापळा लावला होता. रात्री ८.३० वाजण्याच्या सुमारास सानपाडा सेक्टर-५ मधील गावदेवी मैदानाच्या बाजूला मोफाजूल, मेहबूब व मासूद हे तिघेही नोटा बदलून घेण्यासाठी गेले असताना, मयुर मंगे हे पोलिसांच्या सुचनेप्रमाणे त्यांना भेटण्यासाठी गेले. या वेळी तिघा आरोपींनी बॅगेतून अमेरिकन डॉलरचे बंडल आणल्याचे भासवून त्यांना एक नोटांचे बंडल दाखवले. याचवेळी त्या भागात दबा धरून बसलेल्या पोलिसांनी या तिघांची धरपकड केली. त्यानंतर पोलिसांनी त्यांच्या जवळ सापडलेल्या नोटांच्या बंडलची तपासणी केली असता, कागदाच्या बंडलवर २० डॉलरच्या दोन नोटा लावल्याचे आढळून आले. त्यानंतर पोलिसांनी या तिघांवर फसवणुकीचा गुन्हा दाखल करून तिघांना अटक केली आहे.

# दिवाळखोरीत गेलेल्या कंपनीची जमीन कोट्यवधी रुपयांना विकली

## कंपनीच्या संचालकावर फसवणुकीचा गुन्हा

**नवी मुंबई** : दिवाळखोरीत काढलेल्या कंपनीची मालमत्ता विक्री करण्यास राष्ट्रीय लवादाने मनाई केली असतानादेखील कंपनीच्या संचालकाने यातील जमिनीचा एका बांधकाम व्यावसायिकाला १४ कोटी ३० लाख रुपयांना विकून त्यापैकी ७ कोटी ८६ लाख रुपये उकळल्याचा प्रकार उघडकीस आला आहे. नवी मुंबई पोलिसांच्या आर्थिक गुन्हे शाखेने या प्रकरणातील कंपनीचा संचालक अमित अगरवाल याच्या विरोधात पनवेल तालुका पोलीस ठाण्यात फसवणुकीसह अपहाराचा गुन्हा दाखल करून तपासाला सुरुवात केली आहे.

पनवेलमधील मौजे-खानावळे येथील मे. सुप्रिया ट्रान्स्पोर्ट ऑर्गनायझेशन प्रा. लि. या कंपनीची जमीन विक्रीसाठी उपलब्ध असल्याची माहिती नेरुळमध्ये राहणारे बांधकाम व्यावसायिक भिमेश मेहता (४५) यांना गेल्या ऑगस्ट २०२३ मध्ये मिळाली होती. ही जमीन विकत घ्यायची असल्याने मेहता यांनी या कंपनीचे संचालक अमित अगरवाल यांची भेट घेतली होती. त्या वेळी अगरवाल याने या जमिनीचे टायटल क्लियर असल्याचे सांगून कंपनीची कागदपत्रे दाखवल्यांनतर या दोघांमध्ये १४ कोटी ३० लाख रुपयांमध्ये जमीन खरेदी-विक्रीचा व्यवहार ठरला. त्यानंतर मेहता यांनी अगरवाल यांना ७ कोटी ८६ लाख रुपये देऊन उर्वरित रकमेचे चेकसुद्धा दिले होते.

त्यानंतर त्यांच्या मध्ये खरेदीखत झाल्यानंतर मे. सुप्रिया ट्रान्स्पोर्ट ऑर्गनायझेशन प्रा. लि. या कंपनीविरोधात चालू असलेल्या विविध न्यायालयीन प्रकरणाबाबत मेहता यांना माहिती मिळाली. त्यानंतर मेहता यांनी त्याबाबत अधिक माहिती काढली असता, अमित अगरवाल याने त्याच्या मालकीची जमीन ॲक्सिस बँकेकडे तारण ठेवून बँकेकडून कर्ज घेतल्याचे व सदर कर्जाची मुदतीत परतफेड केली नसल्याची माहिती मिळाली. त्यामुळे मुंबई येथील राष्ट्रीय कंपनी कायदा लवादाने सप्टेंबर २०२३ मध्ये सदर कंपनी दिवाळखोरीत काढून त्या कंपनीच्या नावे असलेली कोणतीही मालमत्ता विक्री करण्यात येऊ नये, असे आदेश दिले होते.

मात्र, त्यानंतरदेखील अमित अगरवाल यांनी याबाबतची माहिती लपवून जमिनीचे टायटल क्लियर असल्याचे भासवून बांधकाम व्यावसायिक भिमेश मेहता यांच्या सोबत पनवेल येथील मौजे खानवळे येथील कंपनीच्या मालकीच्या जमिनीचा विक्री व्यवहार करून फसवणूक केल्याचे आढळून आले.

## सायबर चोरांनी लुटलेली रक्कम मिळाली परत



**मुंबई** : कुरिअरमध्ये ड्रग्ज असल्याची बतावणी करत सायबर चोरांनी लुटलेली ८ लाख ४३ हजार रुपयांची रक्कम गोल्डन अवरमध्ये परत मिळविण्यात ओशिवरा पोलिसांना यश आले आहे. पोलिसांनी गुन्ह्यातील आरोपी शिशपाल पृथ्वीराज शर्मा (४३) याला राजस्थानमधून बेड्या ठोकल्या आहेत. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, १७ फेब्रुवारीच्या सकाळी पावणे दहा ते पावणे अकराच्या दरम्यान हा गुन्हा घडला. यातील फिर्यादी हे घरी असताना सायबर ठगाने त्यांना कॉल केला. त्याने तो फेडेक्स कुरिअर सर्व्हिसमधून बोलत असल्याची बतावणी केली. तर, त्याच्या साथीदाराने सायबर पोलीस अधिकारी असल्याचे सांगून एअरपोर्ट मुंबई येथून बोलत असल्याची बतावणी केली.फिर्यादी यांना त्यांच्या नावाने अंमली पदार्थ असणारे पार्सल मागविण्यात आले असून, या प्रकरणात तस्करीचा गुन्हा दाखल झाला आहे.

## पिस्तुले विक्रीसाठी आलेल्या आरोपीला बेड्या

**मुंबई** : चेंबूरमध्ये पिस्तुले विक्रीसाठी आलेल्या आरोपीला गुन्हे शाखेने बेड्या ठोकल्या आहेत. वसीम नन्हे खान (४२) असे अटक आरोपीचे नाव असून पोलिसांनी त्याच्याजवळून देशी बनावटीच्या दोन पिस्तुलांसह ४ जिवंत कडतुसे जप्त केली आहेत. चेंबूरच्या अमर महल, छेडा नगर जंक्शन येथे गुन्हे शाखेच्या कक्ष चारचे प्रपोनि. इंद्रजित मोरे यांच्या नेतृत्वात सपोनि. अजय बिराजदार आणि पथकाने शनिवारी दुपारी सापळा रचून खान याला बेड्या ठोकल्या. पोलिसांनी याप्रकरणी टिळक नगर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल केला असून घाटकोपर पश्चिमेकडील नित्यानंद नगरमधील मूळ रहिवासी असलेल्या खान याने पिस्तुले कोणाकडून आणली आणि तो याची कोणाला विक्री करणार होता, याचा पोलीस शोध घेत आहेत.

# वाशीतील महावितरणचे दोन अधिकारी-कर्मचारी एसीबीच्या जाळ्यात

**वाशी** : रेस्टॉरंटसाठी नवीन कमर्शिअल वीज मीटर बसवण्यासाठी ५ हजार रुपयांची लाच स्वीकारणाऱ्या महावितरणच्या वाशी जुहूगाव कार्यालयातील अधिकारी, कर्मचाऱ्याला नवी मुंबई लाचलुचपत प्रतिबंधक कक्षाच्या पथकाने (एसीबी) अटक केली आहे. शुक्रवारी सायंकाळी वाशीतील पंजाबी मिल्स आयएनसी या रेस्टॉरंटमध्ये ही कारवाई झाली. प्रधान तंत्रज्ञ दीपक मराठे व सहाय्यक अभियंता सचिन फुलझेले अशी अटक केलेल्यांची नावे असून, पुढील तपास सुरू आहे.

या प्रकरणातील तक्रारदार इंद्रजीत सिंग (५६) यांचे वाशी सेक्टर-९ एमध्ये पंजाबी मिल्स आयएनसी या नावाचे रेस्टॉरंट असून, या रेस्टॉरंटसाठी नवीन कमर्शिअल वीजमीटर बसवण्यासाठी महावितरणच्या वाशी जुहूगाव कार्यालयातील प्रधान तंत्रज्ञ दीपक मराठे याने स्वतःसाठी एक हजार रुपये व सहाय्यक अभियंता सचिन फुलझेले यांच्यासाठी ४ हजार रुपये अशी एकूण ५ हजार रुपये लाचेची मागणी केली होती. त्यामुळे इंद्रजीत सिंग यांनी नवी मुंबई एसीबीच्या कार्यालयात तक्रार दाखल केली होती. त्यानुसार एसीबीच्या पथकाने याबाबत सत्यता पडताळणी केली असता, दीपक मराठे याने इंद्रजीत सिंग यांच्या रेस्टॉरंटला कमर्शिअल वीजमीटर बसवण्यासाठी ५ हजार रुपये लाचेची मागणी केल्याचे निषन्न झाले.

तसेच दीपक मराठे याने इंद्रजित सिंग यांच्या रेस्टॉरंटमध्ये लाचेची रक्कम स्वीकारण्याचे कबूल केल्यानंतर शुक्रवारी सायंकाळी एसीबीच्या पथकाने इंद्रजित सिंग यांच्या रेस्टॉरंटमध्ये सापळा लावला होता. या वेळी दीपक मराठे याने इंद्रजित सिंग यांच्याकडून स्वतःसाठी एक हजार रुपये व त्याचे वरिष्ठ अधिकारी सहाय्यक अभियंता सचिन फुलझेले यांच्यासाठी ४ हजार रुपये असे एकूण ५ हजार रुपये रेस्टारँटच्या किचनमध्ये स्वीकारल्यानंतर एसीबीच्या पथकाने त्याला रंगेहाथ पकडले. त्यानंतर एसीबीच्या पथकाने सहाय्यक अभियंता सचिन फुलझेले यालादेखील अटक केली. या दोघांविरोधात वाशी पोलीस ठाण्यात भ्रष्टाचार प्रतिबंधक अधिनियमानुसार गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

# सहा वर्षीय मुलाकडून शरीरसंबंधाचे मोबाईलवरून चित्रीकरण करून घेतले

## महिला व तिच्या प्रियकराविरोधात पॉक्सोअंतर्गत गुन्हा दाखल

**उरण** : उरण भागात राहणाऱ्या एका महिलेने आपल्या सहा वर्षीय लहान मुलाकडून प्रियकरासोबत शरीरसंबंध करतानाचे मोबाईलवरून चित्रीकरण करून घेतल्याचा धक्कादायक प्रकार उघडकीस आला. उरण पोलिसांनी या महिलेविरोधात तसेच तिच्यासोबत अनैतिक संबंध ठेवणाऱ्या तिच्या प्रियकराविरोधात पॉक्सोअंतर्गत गुन्हा दाखल केला आहे. या दोघांनी लहान मुलाकडून अश्लील कृत्य करतानाचे व्हिडीओ चित्रीकरण करून घेऊन बालमनावर वाईट परिणाम होतील, असे गैरकृत्य केल्याने त्यांच्यावर हा गुन्हा दाखल करण्यात आल्याची माहिती पोलिसांनी दिली.

या घटनेतील २५ वर्षीय आरोपी महिला व तिच्यासोबत अनैतिक संबंध ठेवणारा तिचा प्रियकर हे दोघेही उरण भागात राहतात. मागील तीन वर्षांपासून या दोघांमध्ये अनैतिक संबंध सुरू असून काही महिन्यांपूर्वीच या महिलेच्या पतीला या दोघांमधील अनैतिक संबंधांची माहिती मिळाली होती. त्यानंतर पतीने या महिलेला सोडून दिल्यानंतर ही महिला आपल्या मुलासह वेगळी राहत होती. गेल्या महिन्यामध्ये या महिलेचे तिच्या प्रियकरासोबत पैशाच्या देवाणघेवाणीवरून वाद होऊन भांडण झाले होते. त्यानंतर या महिलेने आपल्या प्रियकराविरोधात उरण पोलीस ठाण्यात बलात्कार व जीवे मारण्याचा प्रयत्न केल्याप्रकरणी गुन्हा दाखल केला होता. त्यानुसार पोलिसांनी या महिलेच्या प्रियकराला अटक केली होती. दरम्यान, प्रियकराने या गुन्ह्यात जामीन मिळवण्यासाठी पनवेल सत्र न्यायालयात धाव घेऊन या महिलेसोबत आपले तीन-चार वर्षांपासून प्रेमसंबंध असल्याचे सांगितले. तसेच या प्रियकराने पुरावा म्हणून त्यांच्यातील शरीरसंबंधांचा व्हिडीओ देखील न्यायालयात सादर केला. या दोघांमधील शरीरसंबंधाचा व्हिडीओ एक लहान मुलगा काढत असल्याचे लक्षात आल्यानंतर न्यायाधीशांनी याबाबत प्रियकराकडे चौकशी केली असता, त्यानेच या महिलेच्या ६ वर्षीय मुलाला त्यांच्यातील शरीरसंबंधाचे चित्रीकरण काढण्यासाठी मोबाईल दिल्याचे न्यायालयासमोर कबूल केले. या प्रकरणात या महिलेने व तिच्या प्रियकराने ६ वर्षीय मुलाला त्यांच्यातील शरीरसंबंधाचे मोबाईलवर चित्रीकरण करण्यास सांगून यातील मुलाच्या बालमनावर वाईट परिणाम होईल, असे गैरकृत्य करून या मुलाची लैंगिक छळवणूक केल्याचे आढळल्यानंतर न्यायाधीशांनी याची गंभीर दखल घेतली.

# मित्राच्या १० वर्षीय मुलाची हत्या करणारा अटकेत

**नवी मुंबई** : पूर्वी झालेल्या किरकोळ वादाचा राग मनात धरून उरणच्या चिर्ले भागात राहणाऱ्या एका व्यक्तीने आपल्या मित्राच्या १० वर्षीय मुलाची गळा चिरून हत्या केल्याची घटना उघडकीस आली आहे. कांतालाल सीताराम यादव (४५) असे या व्यक्तीचे नाव असून तो आपल्या मूळ गावी पळून जाण्याच्या प्रयत्नात असताना उरण पोलिसांनी त्याला अटक केली आहे.

या घटनेतील मृत हर्ष यादव (१०) हा उरणमधील चिर्ले गावात आईवडील व बहिणीसह राहत होता. हर्षची आई व बहीण मूळ गावी गेले असल्याने हर्ष आपले वडील बिंदू ऊर्फ शिव रामअजोर यादव (३३) याच्यासह राहत होता. मंगळवारी बिंदूला आपल्या पिकअप गाडीमध्ये भरलेला माल द्रोणागिरीमधील बेस्ट रोडवेज येथे खाली करून पुन्हा त्याला आयसीटीपीएल (ग्लोबीकॉन) सीएफएस येथे गाडीमध्ये माल भरायचा होता. त्याठिकाणी लहानग्या हर्ष याला घेऊन जाता येत नसल्याने बिंदू याने बेस्ट रोडवेज याठिकाणी त्याच्या ओळखीतील आरोपी कांतालाल सीताराम यादव हा भेटला. त्यामुळे बिंदू याने सायंकाळी सव्वासात वाजण्याच्या सुमारास आपला मुलगा हर्ष याला आरोपी कांतालाल यादव याच्या ताब्यात देऊन त्याला चिर्ले येथील घरी सोडण्यास सांगितले होते. मात्र आरोपी कांतालाल यादव याने हर्ष याला घरी न सोडता बिंदू याच्यासोबत वर्षभरापूर्वी झालेल्या किरकोळ वादाचा राग मनात धरून हर्षला रिलायन्स रोडच्या बाजूला भेंडखळ गावाजवळ नेऊन हर्षचा चाकूने गळा कापून त्याचा मृतदेह खाडीतील पाण्यात टाकून पलायन केले. रात्री बिंदू घरी आल्यानंतर घरामध्ये हर्ष नसल्याचे त्याच्या निदर्शनास आले. त्यानंतर त्याने आरोपी कांतालाल याला शोधण्याचा प्रयत्न केला असता, तोदेखील त्याच्या



घरी नसल्याचे व त्याचा फोनदेखील बंद असल्याचे आढळून आले. त्यानंतर बिंदू याने रात्रभर कांतालाल यादव आणि मुलगा हर्ष या दोघांचा शोध घेतला. मात्र दोघेही सापडले नाहीत. बुधवारी सकाळी उरणमधील रिलायन्स रोडच्या बाजूला भेंडखळ गावाजवळील खाडीतील पाण्यात लहान मुलाचा मृतदेह पडल्याची माहिती मिळाल्यानंतर पोलिसांनी घटनास्थळी धाव घेऊन हा मृतदेह ताब्यात घेतला. याचदरम्यान मुलगा हरवल्याची तक्रार देण्यासाठी बिंदू उरण पोलीस ठाण्यात गेला असताना, त्याच्या मुलाची हत्या करण्यात आल्याचे उघडकीस आले.

## बनावट नोटा छापणारा अटकेत

**नवी मुंबई** : नवी मुंबई पोलिसांच्या मध्यवर्ती गुन्हे शाखेने तळोजा भागातील तोंडरे गावातील एका घरावर छापा मारून बनावट नोटा छापणाऱ्या एका तरुणाला अटक केली. प्रफुल्ल गोविंद पाटील (२६) असे या आरोपीचे नाव असून त्याने यू-ट्युबवर पाहून आपल्या घरातच बनावट नोटा छापल्याचे उघडकीस आले आहे. पोलिसांनी त्याच्या घरातून २ लाख ३ हजार रुपये किमतीच्या बनावट नोटा तसेच बनावट नोटा तयार करण्यासाठी लागणारे साहित्य जप्त केले आहे. या कारवाईत अटक करण्यात आलेला आरोपी प्रफुल्ल गोविंद पाटील हा तळोजा एमआयडीसीतील तोंडरे गावात राहत होता.

# स्वस्तात फ्लॅट देण्याच्या आमिषाने लाखोंची फसवणूक

**मुंबई** : स्वस्तात म्हाडाचा फ्लॅट मिळवून देण्याचे आमिष दाखवून तिघांनी कुर्ल्यातील एका महिलेकडून २० लाख ७३ हजार रुपये घेत तिची फसवणूक केल्याचा प्रकार समोर आला आहे. याप्रकरणी गुन्हा दाखल करून नेहरू नगर पोलीस अधिक तपास करत आहेत.

कुर्ला पश्चिमेकडील सोनापूर लेन परिसरात राहत असलेल्या ५५ वर्षीय तक्रारदार आणि त्यांच्या पतीने २००३ साली नवी मुंबईतील खारघर येथे एक फ्लॅट खरेदी केला होता. तिन्ही मुलींचे विवाह केल्यानंतर तक्रारदार यांच्या कुटुंबावर खूप कर्ज झाले. त्यामुळे त्यांनी आणि पतीने नवी मुंबईतील




फ्लॅट विक्री करून कर्ज फेडण्याचे ठरवले. चेंबूरमध्ये नोकरी करत असताना तक्रारदार यांना आबा पाटील यांच्याकडून जॉय डॅनियल नावाचा व्यक्ती म्हाडाचे फ्लॅट स्वस्तात मिळवून देत असल्याचे त्यांना समजले. तक्रारदार यांनी एप्रिल २०२२ मध्ये जॉय डॅनियल याची भेट घेतली. डॅनियल याने त्याचा मित्र भगवान सिंग हा म्हाडामध्ये उच्च पदस्थ अधिकारी असून त्याच्या ओळखीतून त्याने म्हाडाची दोन घरे बुक केली आहेत. पुढच्या महिन्यात या घरांच्या चाव्या त्याला मिळणार आहेत, अशी बतावणी करत म्हाडाचे ५०० चौरस फुटांचे घर ३० लाख रुपयांत देण्याचे आमिष तक्रारदार यांना दाखविले. तक्रारदार यांनी घर खरेदीला होकार देताच सुरुवातीला त्यांच्याकडून काही कागदपत्रे घेण्यात आली. त्यानंतर डॅनियलने १४ लाख ७५ हजार रुपये आणि भगवान सिंग याने ५ लाख ९८ हजार रुपये असे दोघांनी मिळून तक्रारदार यांच्याकडून २० लाख ७३ हजार ६२५ रुपये उकळले.

# भायखळ्यात सायबर ठगांकडून ४.६० लाखांना गंडा

**मुंबई** : मोतीलाल ओसवाल सेक्युरिटी कंपनीमध्ये तीन हजार मेंबर भरायचे असल्याचा संदेश पाठवून सायबर ठगांनी भायखळ्यातील एका व्यक्तीला ४ लाख ६० हजार रुपयांना गंडा घातल्याचा प्रकार समोर आला आहे. याप्रकरणी अज्ञात आरोपींविरोधात गुन्हा दाखल करून भायखळा पोलीस अधिक तपास करत आहेत.

भायखळा पूर्वेकडील दादोजी कोंडदेव मार्ग परिसरात कुटुंबासोबत राहत असलेले ५० वर्षीय तक्रारदार हे एका विमा कंपनीत नोकरी करतात. २२ मार्चला त्यांना एका अनोळखी मोबाईल नंबरवरून व्हॉट्सॲपवर मोतीलाल ओसवाल सेक्युरिटी कंपनी मध्ये तीन हजार मेंबर भरायचे असल्याने इच्छुक असल्यास तत्काळ संपर्क साधा, असा मेसेज आला. पुढे त्या कंपनीमध्ये सहभागी झाल्यास होणारा फायद्याचा एक चार्ट पाठवण्यात आला. चार्ट बघून तक्रारदार यांनी संबंधित क्रमांकावर कॉल करून अधिक माहिती विचारली. त्यांना व्हॉट्सॲपवर एका महिलेने कॉल आणि चॅटिंग करत एका लिंकच्या माध्यमातून एक ॲप्लिकेशन डाऊनलोड करण्यास भाग पाडत. त्यात वैयक्तिक आणि आधार कार्ड, बँक खात्याची माहिती भरून



घेतली. तक्रारदार यांना सुरुवातीला २० हजार रुपये भरण्यास सांगून मोठा फायदा झाल्याचे भासवण्यात आले.

मोतीलाल ओसवाल यूपीआयधारक, कुमार ट्रेडरर्स यूपीआयधारक यावर रक्कम भरून घेण्यात आली. तक्रारदार यांना २५ हजार रुपये काढायचे असल्याने त्यांनी भरलेली रक्कम आणि झालेला फायदा यातून २५ हजार रुपये देण्याची विनंती केली. मात्र, सर्व रक्कम काढावी लागेल आणि त्यासाठी १ लाख २३ हजार रुपये भरावे लागतील, असे सांगण्यात आले. त्यामुळे तक्रारदार यांना आपली फसवणूक होत असल्याचे लक्षात आले. तक्रारदार यांनी तोपर्यंत ४ लाख ६० हजार रुपये गमावले होते. आपली फसवणूक झाल्याची खात्री पटल्याने त्यांनी अधिक रक्कम भरण्यास नकार देत भायखळा पोलीस ठाणे गाठून ऑनलाइन आर्थिक फसवणुकीची तक्रार दिली आहे.

# आमिष दाखवून ७८ लाखांना फसवणूक

**मुंबई** : शेअर मार्केटमध्ये गुंतवणूक केल्यास दुप्पट परतावा देण्याचे आमिष दाखवून तिघांनी एका कापड व्यापाऱ्याकडून ७८ लाख रुपये घेऊन त्यांची फसवणूक केल्याचा प्रकार भायखळ्यामध्ये उघडकीस आला आहे. याप्रकरणी इमरान कुरेशी याच्यासह त्याची बहीण तस्लीम आणि भाचा कैफ यांच्या विरोधात गुन्हा दाखल करून भायखळा पोलीस अधिक तपास करीत आहेत.




येथील डॉकयार्ड रोड परिसरात राहत असलेल्या ४६ वर्षीय तक्रारदार यांचा लहान मुलांचे कपडे घाऊक दराने विक्रीचा व्यवसाय आहे. तसेच, मित्रांसोबत मिळून ते अन्य व्यवसाय करतात. जानेवारी २०२२ मध्ये त्यांची इमरान कुरेशी याच्यासोबत ओळख झाली. त्याने एका बड्या कंपनीचा मालक असल्याची ओळख दिली होती. शेअर मार्केटमध्ये अनेक चांगल्या गुंतवणुकीच्या संधी असून, शेअर मार्केटमध्ये गुंतवणूक केल्यास चांगला पैसा कमावून देण्याचे आमिष दाखविले. पुढे त्याने आठ महिन्यांत गुंतवणूक केलेल्या रकमेस दुप्पट करून देतो, असे सांगितले. तक्रारदार यांनी सुरुवातीच्या १५ दिवसांत सुमारे २० लाखांची गुंतवणूक केली. पुढे त्यांनी एकूण ८० लाख रुपये त्याच्याकडे गुंतवले. सुरुवातीला केलेल्या २० लाखांच्या गुंतवणुकीला आठ महिने पूर्ण झाल्याने तक्रारदार यांना ४० लाख रुपये मिळणे अपेक्षित होते. याबाबत विचारणा करण्यासाठी तक्रारदार हे इमरानच्या नागपाडा येथील कार्यालयात गेले असता त्यांना इमरान त्याची बहीण तस्लीम आणि भाचा कैफ भेटले. त्यांनी हिशोब पूर्ण न झाल्याने अजून पैसे आले नाही, असे सांगून वेळ मारून नेली. पुढील महिन्यातसुद्धा पैसे न मिळाल्याने तक्रारदार यांना संशय आला. तक्रारदार यांनी पुन्हा विचारणा केली असता सेबीने कंपनीचे खाते गोठविल्याचे सांगितले. त्यानंतर मात्र इमरानने अशा प्रकारे सुमारे १५० जणांकडून गुंतवणूक स्वीकारून त्यांची फसवणूक केल्याचे तक्रारदार यांना समजले. तक्रारदार यांनी पोलिसात तक्रार करण्याची धमकी दिल्यानंतर त्यांना दोन लाख रुपये परत करण्यात आले.

गुंतवणुकीच्या रकमेतून इमरानने जमीन, मालमत्ता, महागड्या गाड्या खरेदी केल्याचे उघड झाले. गेल्या वर्षी एप्रिल महिन्यात इमरान गायब झाला. त्यानंतर मात्र आपली फसवणूक झाल्याची तक्रारदार यांची खात्री पटली. अखेर, त्यांनी भायखळा पोलीस ठाणे गाठून इमरान कुरेशी याच्यासह त्याची बहीण तस्लीम आणि भाचा कैफ यांच्याविरोधात ७८ लाख रुपयांच्या आर्थिक फसवणुकीचीतक्रार दिली आहे.

# पतीच्या छळाला कंटाळून नवविवाहितेची आत्महत्या

मुंबई : लग्नात सोनसाखळी आणि भांड्यांचे पैसे न दिल्याने पतीकडून सुरू असलेल्या शारीरिक आणि मानसिक छळाला कंटाळून २३ वर्षीय मुलीने ओढणीच्या सहाय्याने गळफास घेऊन आत्महत्या केल्याची घटना शुक्रवारी मानखुर्दमध्ये घडली. श्वेता लिटे असे मृत विवाहितेचे नाव आहे. याप्रकरणी पती कुणाल विरोधात गुन्हा दाखल करून ट्रॉम्बे पोलीस अधिक तपास करीत आहेत.

नाशिकमधील रहिवासी असलेली मुलीची आई अलका चिखले यांनी पोलिसांत दिलेल्या फिर्यादीनुसार, त्यांची मोठी मुलगी श्वेताचा कुणाल लिटे याच्याशी गेल्यावर्षी २१ मे रोजी विवाह झाला. हे लग्न ठरत असताना कुणालने चिखले कुटुंबाकडे सोनसाखळीची मागणी केली होती. शेती व्यवसाय असल्याने चिखले कुटुंबीयांनी लग्नानंतर शेतीमालाचे पैसे आले की सोनसाखळी करून देऊ, असे सांगितले. मूळचा अहमदनगरचा असलेला कुणाल हा पुण्यात एका खासगी कंपनीत इंजिनीयर म्हणून नोकरी करत असल्याने विवाहानंतर ते दोघे एकत्र पुण्यात राहायला गेले. येथे कुणाल हा लग्नात सोनसाखळी आणि भांड्यांचे पैसे दिले नाहीत असे सांगून पैशांची मागणी करू लागला. तेव्हा बीफार्म असलेल्या श्वेताने एका मेडिकल दुकानात नोकरी करण्यास सुरुवात केली. तिच्या पगाराची पूर्ण रक्कम तो काढून घेत होता. त्यानंतर मुंबईत बदली झाल्याने दोघेही मानखुर्द, महाराष्ट्रनगरमध्ये भाड्याची खोली घेऊन राहू लागले. यावेळी त्याने श्वेतासोबत वाद घालून तिच्याकडून घरभाड्यासाठी पैसे घेतले. लग्नात सोनसाखळी आणि भांड्यांचे पैसे दिले नाहीत म्हणून कुणाल वारंवार तिला शिवीगाळ करून मारहाण करू लागला. या शारीरिक आणि मानसिक छळाला कंटाळून अखेर श्वेताने शुक्रवारी घरातील छताच्या लोखंडी कडीला ओढणीच्या सहाय्याने गळफास घेत आत्महत्या केली. पोलिसांनी याप्रकरणी अलका यांची फिर्याद नोंदवून घेत पती कुणाल विरोधात गुन्हा दाखल केला आहे.

## संपादकीय

# कुटुंब गेले कुणीकडे?



संपादक दिपक मोरेश्वर नाईक

कालच्या बुधवारी जगात सर्वत्र आंतरराष्ट्रीय कुटुंब दिन साजरा होत असताना या दिवसाच्या पूर्वसंध्येस भारतात मात्र, एका वेगळ्या बातमीची चर्चा सुरू होती. घडी विस्कटलेल्या कुटुंबांतील भावी पिढ्यांच्या भविष्याचा एक प्रश्न या चर्चेतून अधोरेखित होत होता. २०१६ ते २०२१ या पाच वर्षांच्या काळात देशातील जवळपास दहा हजार मुले चुकीच्या पद्धतीने प्रौढांच्या तुरुंगात बंदिवास भोगत असल्याची माहिती उजेडात आली आणि अनेक जुनेच प्रश्न पुन्हा ऐरणीवर आले. तुरुंगवास भोगत असलेल्या मुलांच्या आकडेवारीवरून २०१६ मध्ये मुंबई उच्च न्यायालयाने सरकारला धारेवर धरले होते. त्यानंतरच्या ताज्या आकडेवारीचा हा तपशील पाहता, तुरुंगातील मुलांच्या भवितव्याच्या मुद्द्यावर फारसे सकारात्मक काही झाले नसावे असे मानण्यास वाव आहे. आई-वडिलांना तुरुंगवास झाल्यानंतर एकाकी झालेल्या मुलांबाबत सरकारने काही निश्चित धोरण आखले पाहिजे, अशी मागणी त्या वर्षी न्यायालयासमोर झाली होती. आईसोबत तुरुंगात राहणाऱ्या मुलांना काही ठराविक वयानंतर बाहेर पाठविले जाते. अशा मुलांचे काय होते, ती मुले तुरुंगाबाहेर गेली तरी कुटुंब व्यवस्थेशी त्यांचे नाते राहिलेले असते का, असे काही प्रश्न न्यायालयाने सरकारसमोर उभे केले होते. त्यानंतरच्या एका खटल्यात, अशा मुलांचे भवितव्य सुरक्षित करण्याची जबाबदारी सरकारचीच असल्याचा निर्वाळा न्यायालयांनी दिला होता, त्यालाही आता सात वर्षे झाली. त्यापुढच्या पाच वर्षांची आकडेवारी माहितीच्या अधिकारातून नुकतीच समोर आली आहे. जगभर आंतरराष्ट्रीय कुटुंब दिवस साजरा होत असताना, त्या दिवसाच्या पूर्वसंध्येलाच, दहा हजार मुले चुकीच्या पद्धतीने प्रौढांच्या तुरुंगात तुरुंगवास भोगत असल्याची बातमी चर्चेस यावी हा एक अस्वस्थ योगायोग म्हणावा लागेल. एकीकडे कुटुंबव्यवस्था जपण्यासाठी आंतरराष्ट्रीय स्तरावर असे काही सोहळे साजरे केले जात असताना, कुटुंब हरवलेल्या या भावी पिढीच्या भविष्यावरचे प्रश्नचिन्ह अधिक गडद व्हावे, हे कुटुंब दिनाच्या सोहळ्याचे गालबोट ठरले आहे.

अगोदरच जागतिकीकरणामुळे बदललेल्या विकासाच्या प्राधान्यक्रमाचा मोठा फटका मुलांना आणि महिलांनाच बसत असतो. मंदीसारख्या संकटांची सर्वाधिक झळही त्यांनाच सहन करावी लागते. जागतिकीकरणामुळे बदलणाऱ्या प्राधान्यक्रमांच्या यादीत, माता-बालकांचे आरोग्य, मुलांचे शिक्षण असे प्रश्न मागे पडतात. विशेषतः विकसनशील देशांत ही समस्या वाढत असून हा प्रश्न हाताळण्याच्या इच्छाशक्तीचा अभाव भविष्यात गंभीर समस्या निर्माण करू शकतो, असा इशारा संयुक्त राष्ट्रसंघाच्या लोकसंख्या निधीने दिला होता. केवळ पुरेशा उपचारांच्या अभावामुळे दर वर्षी जगात पाच लाख महिलांचा गर्भवती असताना किंवा प्रसूतीच्या वेळी मृत्यू ओढवतो, अशी एक आकडेवारी काही वर्षांपूर्वी उघड झाली होती. यात अजूनही फारसा बदल संभवत नाही. आफ्रिकी देशांमध्ये हे प्रमाण सर्वाधिक असून, ते प्रगत देशांच्या शंभरपट अधिक असल्याचे लोकसंख्या निधीच्या तेव्हाच्या पाहणीत स्पष्ट झाले होते. भविष्याचा वेध घेण्याची मानसिकता स्त्रीच्या अंगी निसर्गतच असल्याने, बालकांचे भविष्य निर्भर करण्यात तिचा मोठा वाटा असतो. त्यामुळे महिलांचे आरोग्य आणि मानसिकता जपणे ही कुटुंबव्यवस्था जपण्याच्या प्रक्रियेची पहिली गरज आहे.

आर्थिक मंदीसारख्या समस्यांमुळे बेरोजगारी वाढते. यातही महिलांमधील बेरोजगारी पुरुषांपेक्षा अधिक असेल तर सहाजिकच महिलांची मोठ्या प्रमाणावर पिळवणूक होते. कुटुंबाच्या चरितार्थाची साधने जेव्हा आकसतात, तेव्हा मुलींचे शिक्षण ही तर निव्वळ चैनीची बाब बनते. मंदीमुळे जगभरातील अनेक देशांमध्ये नेमकी हीच स्थिती उद्‌भवण्याची भीती असल्याने महिला आणि मुलींच्या हक्कांचे संरक्षण करण्याची गरज अधोरेखित झाली आहे. कुटुंब व्यवस्था जपणे, सुदृढ करणे ही काळाची गरज मानली, तर भावी पिढी म्हणून ज्यांच्याकडे पाहिले जाते, त्यांच्या वर्तमानकाळाच्या गरजा ओळखल्या गेल्या पाहिजेत. तुरुंगातील मुलांबाबतच्या या बातमीतून ही गरज पुढे आली आहे. आई-वडिलांच्या शिक्षेमुळे त्यांच्या निरपराध मुलांना गजाआड राहण्याची वेळ यावी आणि त्यांच्या करपलेल्या वर्तमानकाळामुळे भविष्यकाळही भेसूर व्हावा हे चित्र कुटुंबव्यवस्थेचा पुरस्कार करणाऱ्या जगाला शोभादायक नाही.

दुष्काळ, नैसर्गिक आपत्ती, महामारीसारखी संकटे अशा अनेक आव्हानांमुळे गेल्या काही वर्षांत महाराष्ट्रातील अनेक घरांमध्ये दोन वेळा पेटणाऱ्या चुली कदाचित एका वेळेपुरत्या थंडावल्या. सहाजिकच जगण्याचे प्राधान्यक्रम बदलले. ग्रामीण भागात आजही एकत्र कुटुंबपद्धती टिकून आहे. कदाचित ती तिथल्या जीवनपद्धतीची गरज आहे. अशा संकटांमुळे कुटुंबाचे उत्पन्नाचे स्रोत आखडतात आणि काटकसर ही नवी जीवनशैली बनते. कमावत्या हातांची पोटे भरण्यावर भर दिला जातो. माणुसकी जिवंत असली तरी नाईलाजाची त्यावर मात होते आणि एकट्या, निराधार मुलांची, वृद्धांची आबाळ होते. नेहमी असेच होते असे नाही. कारण परिस्थितीचा रेटा किती जोरदार असेल, त्यावरच असे चित्र अवलंबून असते. पण, 'जगण्या'च्या लढाईत माणुसकीचा पराभव होतो, याचे दाखले आजवर कमी नाहीत. दक्षिणेकडच्या काही राज्यांतील तरुण परदेशात, विशेषतः आखाती देशांमध्ये नोकरीधंद्यानिमित्त जात असल्याने घरांमध्ये केवळ वृद्धांचाच वावर उरला असल्याचे एका पाहणीत उघड झाले होते. ही मुले आई-वडिलांच्या उदरनिर्वाहासाठी भरपूर पैसेही पाठवतात, पण देखभाल ही त्यांची उतारवयातील गरज दुर्लक्षित राहते. मग, पैशांची पोतडी सोबत घेऊन त्यांना आश्वस्त आधारासाठी वणवण करावी लागते.

अशा अनेक व्यवहारांनी कुटुंबसंस्थेला घेरले आहे. जगभर साजऱ्या होणाऱ्या कुटुंब दिनासारख्या सोहळ्यांच्या झगमगाटातील एखादा झोत अशा समस्यांवर पडायला काय हरकत आहे?

# शेअर बाजारात भारताचा गोंधळ

भारताचा शेअर बाजार गोंधळून गेलाय. वर जायचं की खाली जाऊन आपटायचं याचा निर्णय त्याला घेता येईना झालाय. निवडणुकीचं वारं वाहायला लागल्यापासून शेअर बाजाराचा निर्देशांक रोज थोडा वर जातो, काही वेळाने खाली येतो. शेवटी मध्येच कुठेतरी थांबतो. त्यामुळे शेअर बाजारातलं चैतन्य हरपलंय. सकाळी सुरुवात झाल्यापासून कधी एकदा दुपारचे साडेतीन वाजतात आणि या कटकटीतून सुटका होते असं निर्देशांकाला झालंय, असं दिसतंय. बरं, सगळेच शेअर खाली किंवा वर जातायत असंही नाही. कोणी वर जायचं आणि कोणी खालची पायरी गाठायची, तसं का वागायचं याचे काही ढोबळ नियम असतात. शेअर बाजार कितीही बेभरवशाचा म्हटलं, तरी त्या विश्वासावरच आडाखे बांधून खरेदी-विक्रीचे हिशेब केले जातात. पण, गेल्या तीन महिन्यांपासून हा निर्देशांक पूर्ण बेबंद झालाय. तुमचं कुठलंच तर्कशास्त्र मला लागू नाही हे तो रोज दाखवून देतोय. त्यामुळे शेअर बाजारातले अनुभवी दलाल, गुंतवणूकदार, गुंतवणूक सल्लागार अक्षरशः कावून गेले आहेत. त्यांनी आता नवगुंतवणूकदारांना '४ जूनपर्यंत बाजारापासून लांबच राहा रे बाबांनो. जे पैसे असतील, ते जपून ठेवा. दहा वेळा विचार करून; चार वेळा कंपन्या तपासून मगच गुंतवणूक करा', असं सांगायला सुरुवात केली आहे. उद्या काय घडेल, ४ जूननंतर काय घडेल, ४ जूनला निवडणुकीचे निकाल काय येतील याबद्दल कोणीच काही अंदाज बांधू शकत नाहीये. कारण आता बाहेर काय चाललं आहे, मतदार इव्हीएम मशीनजवळ जाऊन नेमकं कोणतं बटन दाबतो आहे, याचा अंदाज भल्याभल्या धुरीणांना येत नाही आहे. देशातील उच्च कोटीचे निवडणूक विश्लेषक, तज्ज्ञ, आकडेशास्त्री, संपादक आणि माध्यम मालकांचा १८-२० जणांचा एक गट सध्या देशभर फिरतो आहे. आपल्या दालनात किंवा स्टुडिओत किंवा पेंट हाऊसमध्ये बसून काही अंदाज येत नाही म्हटल्यावर स्वतःच्या खर्चाने राज्यच्या राज्यं पालथी घालताहेत, गावागांवात जाऊन नेत्यांना भेटताहेत. 'लोकांचा मूड काय आहे?', 'लोक काय म्हणतायत?', 'निवडणूक कुठे जाते आहे?' असे त्यांचे प्रश्न आहेत. गंमत म्हणजे, ते ज्या प्रश्नांची उत्तरं मिळवण्यासाठी एवढी यातायात करताहेत; नेत्यांना भेटल्यावर नेते नेमके हेच प्रश्न त्यांना विचारताहेत! या निवडणुकीत मतदार आपल्या ताब्यात राहिलेला नाही, हे नेत्यांना कळून चुकलं आहे. शेअर बाजार त्यामुळेच गोंधळून गेला आहे.

शेअर बाजाराला कंपन्या चालायला हव्या असतात. कंपन्या चालायला हव्यात, तर त्यांचे व्यवसाय चालले पाहिजेत. व्यवसाय चालायला बाजारात मालाला मागणी असायला पाहिजे. बाजारात मागणी यायला ग्राहक खरेदीसाठी तयार असायला पाहिजे. ग्राहकाने खरेदीला बाहेर पडायचं, तर त्याच्या खिशात पैसा असला पाहिजे. पैसा थोडाफार असतोच, पण त्या पैशाला मूल्य चांगलं असलं पाहिजे. म्हणजे त्याच्या जीवनावश्यक गरजा कमी पैशात भागल्या पाहिजेत. म्हणजे महागाई आटोक्यात असायला पाहिजे. पण, महागाई वाढतच जात असेल, तर त्याच्याकडचे सगळे पैसै जगण्यासाठी अत्यावश्यक असलेल्या बाबींसाठीच खर्च होतील. बाकी मग आजारपणं, ऐनवेळी उद्‌भवणाऱ्या खर्चासाठी तो दोन पैसे वाचवायला बघेल. जगण्यासाठी अत्यावश्यक गोष्टींच्या खरेदीतही हात




आखडता होईल. 'आता राहूदे एवढंच, मग बघू पुढं' असं कुटुंबप्रमुखाचं पालुपद सुरू होईल. त्यातून ग्राहकाकडून खरेदी कमी होईल. त्यामुळे बाजारातील मालाची मागणी कमी होईल. मागणी कमी झाल्याने उत्पादकांना उत्पादन कमी करावं लागेल. उत्पादन कमी झालं तर उत्पादक अडचणीत येतील. खरेदी केलेला कच्चा माल तर त्यांना संपवावाच लागेल. तो संपवताना उत्पादन कमी करेल. त्यातून कामगार कमी होतील. माल विकणाऱ्या मॉलचे, दुकानांचे विक्रीव्यवहाराचे आकडे घसरतील. बाजारात नकारात्मक वातावरण पसरेल. ग्राहक चैनीच्या, अत्यावश्यक नसलेल्या गोष्टी खर्च करायला टाळाटाळ करेल... गेली दोन वर्ष तरी बाजारात हीच परिस्थिती आहे. ती अधिकाधिक बिकट होते आहे. मार्च अखेरच्या कंपन्यांच्या ताळेबंदांमध्ये ही बाब प्रकर्षाने दिसते आहे. आणखी एक-दोन तिमाही, म्हणजे साधारण सहा महिने, म्हणजे सप्टेंबर अखेरपर्यंत, म्हणजे येत्या दिवाळीपर्यंत तरी हेच चित्र कायम राहील, असं सगळ्या मोठ्या उद्योजकांचं, त्यांच्या व्यवस्थापकीय संचालकांचं म्हणणं आहे. शेअर बाजार त्यामुळेही धास्तावला आहे.

यातून बाहेर पडण्यासाठी शेअर बाजार निवडणुकीच्या निकालाची वाट पाहतो आहे. 'निवडणूक वर्ष' ही सगळ्याच देशात आर्थिक क्षेत्रासाठी अडचणीची संकल्पना असते. पक्ष कोणतेही असोत, सत्ताधारी कोणीही असोत, निवडणुकीला सामोरं जाताना सत्ताधारी अर्थव्यवस्थेपेक्षा मतांची काळजी जास्त घेतो. आर्थिक क्षेत्राने हे जणू मान्य केलं आहे. त्यामुळे ४ जूनला निवडणुकीचे निकाल लागतील, त्यानंतर सरकार येईल आणि नवं सरकार येत्या पाच वर्षांसाठी दीर्घकालीन आर्थिक धोरण आखेल; त्यातून अर्थव्यवस्थेला नवी उभारी येईल, या अपेक्षेत संपूर्ण आर्थिक, औद्योगिक क्षेत्र तसाच शेअर बाजार आहे. पायाभूत सुविधांसाठी सरकारने केलेल्या खर्चामुळे जीडीपीचा (सकल देशांतर्गत उत्पादन) आकडा मोठा दिसतो आहे, पण नुकत्याच जाहीर झालेल्या कंपन्यांच्या ताळेबंदात त्याला कुठे आधार दिसत नाही. सरकारने केलेल्या पायाभूत सुविधांतील गुंतवणुकीचा परतावा अर्थकारणात दिसायला बराच काळ जावा लागतो. तेवढा काळ थांबणं उद्योग क्षेत्राला शक्य नाही, त्यामुळे ग्राहकाची क्रयशक्ती वाढेल; विशेषतः ग्रामीण अर्थव्यवस्थेतील चलनवलन वाढेल असं धोरण घेणाऱ्या सरकारची संपूर्ण आर्थिक क्षेत्र वाट बघत आहे. त्यांची ही अपेक्षा पूर्ण होते की नाही हे आपल्यालाही ४ जूनलाच समजेल.

# वस्तूंचे इंटरनेट जीवनावश्यक...

पूर्वीही देशात टोल नाके होते आणि तेथे पथकर गोळा केला जात असे. त्यासाठी पावती दिली जात असे. आज तर देशभरात अशा टोल नाक्यांची रांग लागली आहे आणि तेथून कोणतेही वाहन पुढे जायचे असेल तर स्वयंचलित अशा माध्यमातून टोल वसूल केला जातो आणि यात पैशाला मानवी हात लागत नाहीत. तुमच्या वाहनाच्या समोरील काचेला एक रेडिओ फ्रिक्वेन्सी ओळखपट्टी बसवलेली असते आणि यासाठी तुम्ही काही पैसे अगोदरच जमा करून ठेवलेले असतात. त्यातून आताच्या प्रवासाचा कर वजा केला जातो. आपल्या पथकर खात्यात पैसे जमा नसतील तर दुप्पट दंड वगैरे काहीतरी आकारला जातो. अगदी काही मुख्य व्यक्ती सोडल्या तर देशातील कोणतेही वाहन यातून सुटलेलं नाही. या तंत्रज्ञानाचा आधार रेडिओ फ्रिक्वेन्सी ओळखीमध्ये आहे.

असे हे नवे जग आता वस्तूंचे इंटरनेट (इन्टरनेट ऑफ थिंग्ज-आयओटी) या नावाने जागात सर्वत्र संचार करू लागले असून याबद्दल बोलताना या तंत्रज्ञानाचे बीज ज्यांनी रोवले ते केव्हिन ॲश्टन म्हणतात की, जसे इंटरनेटमुळे जग बदलले तशीच किंवा त्यापेक्षाही अधिक प्रमाणात जग बदलण्याची क्षमता वस्तूंच्या इंटरनेटमध्ये आहे. १९६८ मध्ये इंग्लंडमध्ये जन्मलेले केव्हिन यांनी १९९९ साली 'स्मार्ट उपकरणांनी एकमेकांशी जोडलेले जग' ही संकल्पना मांडली. मुळात दररोजच्या वापरातील भौतिक वस्तूंना इंटरनेटच्या माध्यमातून जोडणे अशी ही कल्पना होती आणि यात संवेदकांचे महत्व भरपूर होते. भौतिक वस्तूंमध्ये त्या आपली माहिती इतर जोडलेल्या वस्तूंना पुरवू शकतील असे इलेक्ट्रॉनिक्स तसेच संवेदक अंतर्भूत करायचे आणि त्यांचा उपयोग करायचा असे हे तंत्रज्ञान आहे. आजची स्मार्ट घड्याळे, घरगुती उपकरणे तसेच वाहने या तंत्रज्ञानाच्या उपयोगाची काही उदाहरणे आहेत.

उपकरण ते उपकरण असा संवाद यामधून इतका प्रसारित झाला की, इसवी सन २०१० मध्ये वस्तूंच्या इंटरनेट उपकरणांची संख्या जगाच्या लोकसंख्येपेक्षा अधिक झाली होती. पुढच्या वर्षीपर्यंत तीन हजार कोटी संख्येने अशी उपकरणे वापरात असतील असे मानले जाते. जोडलेले असे पहिले उपकरण आपल्या माहितीचे एटीएम यंत्र होते. वस्तूंच्या इंटरनेट उपकरणांचा वापर करण्यासाठी साधा स्मार्टफोन चालू शकतो. ही उपकरणे आताच्या वेळेवर चालू शकतात. त्यासाठी फक्त इंटरनेट आवश्यक आहे. अशा उपकरणामुळे घरातील कोणती वस्तू संपत आली आहे याची तुम्हाला मोबाईलवर सूचना मिळू शकेल. एकंदरीत काय तर आपले जीवन अधिक सुखकर होऊ शकेल. या उपकरणांच्या उपयोगातून दिवसा सुरू राहणारे रस्त्यावरचे दिवे आता दिसू शकणार नाहीत.

# जीवनाला चालना देणारे विशाल प्राचीन पर्वत

'पार्कात', 'टेकडी', 'कडे' हे सामान्यतः माणसाला आकर्षित करणारे डोंगरांचे प्रकार. उंच शिखरावर पोहोचल्यावर सर केल्याचा आनंद आणि वरून दिसणाऱ्या धरणीमातेला पाहून झुकणारे मस्तक आपले पाय जमिनीवर ठेवते!

पृथ्वीच्या नैसर्गिक वातावरणाच्या भव्यतेचा विचार केला तर पर्वत हे आपल्या पृथ्वीच्या सर्वात उल्लेखनीय आणि भव्य भूरूपांपैकी एक रूप आहेत. ते जीवनाला आधार देण्यासाठी मूलभूत विविध संसाधने आणि परिसंस्था आहेत आणि मुख्य म्हणजे त्यांच्यात आपल्या हवामानावर परिणाम करण्याची शक्ती आहे. काही नैसर्गिक भू-राजकीय सीमांचा भाग आहेत, तर काही गिर्यारोहकांना आकर्षित करतात. पर्वतांमध्येदेखील पृथ्वीच्या सर्वात प्राचीन भूतकाळाबद्दल सांगण्यासारखे बरेच काही आहे! पृथ्वीवरील काही सर्वात जुनी शिखरे अब्जावधी वर्षांपासून अस्तित्वात आहेत. यापैकी अनेक पर्वतांची लक्षणीय धूप झाली आहे आणि काही आता जमिनीवरून दिसत नाहीत.

पर्वत हे प्रमुख भूस्वरूप आहेत जे आजूबाजूच्या भूभागापेक्षा लक्षणीयरीत्या वर येतात. पर्वत सामान्यतः समुद्रसपाटीपासून किमान एक हजार फूट उंचीवर पोहोचतात. जवळच्या अंतरावरील पर्वतांच्या समूहाला पर्वतश्रेणी असे संबोधले जाते.

उंच आणि अणकुचीदार अनेक टोके असणाऱ्या शिखरांपासून हलक्या, सौम्य चढ-उतार असलेल्या टेकड्यांपर्यंत पर्वत असू शकतात. ते प्रत्येक खंडात, काही महासागरांखाली आढळू शकतात आणि पृथ्वीच्या भूगर्भशास्त्र, पर्यावरणशास्त्र आणि संस्कृतीत महत्त्वपूर्ण भूमिका बजावतात.

जेव्हा टेक्टोनिक प्लेट्स एकमेकांवर आदळतात तेव्हा एककेंद्राभीमुख प्लेट सीमा तयार करतात. ज्यामुळे विविध भूवैज्ञानिक संरचना आणि घटना घडतात. ही अविरत चालणारी प्रक्रिया आहे. जगातील सर्व ज्वालामुखींपैकी ७५ टक्के पॅसिफिक 'रिंग ऑफ फायर'मध्ये अनेक एककेंद्राभीमुख सीमांचे घर आहे. एककेंद्राभीमुख सीमा प्रक्रियांमुळे मानवी इतिहासातील काही सर्वात प्राणघातक नैसर्गिक आपत्ती उद्भवल्या आहेत, ज्यात मेगा-थ्रस्ट भूकंप आणि त्सुनामी यांचा समावेश आहे.

पृथ्वीचे प्रचंड पर्वत कसे बनले हे कोडे हळूहळू उलगडत आहे. आशियातील हिमालय पर्वतरांगेमध्ये ३००० हून अधिक नामांकित शिखरे आहेत. त्यापैकी नेपाळमधील माउंट एव्हरेस्ट पृथ्वीवरील सर्वात उंच शिखर आहे. जगातील काही खोल पाण्याखालील संरचना कशा तयार झाल्या, यासारखे प्रश्न आजही सुटलेले नाहीत.



दक्षिण आफ्रिकेतील बारबर्टन ग्रीनस्टोन बेल्ट ही मानवाने शोधलेली सर्वात जुनी पर्वतश्रेणी मानली जाते. याला माखोंजवा पर्वत असेही संबोधले जाते. बार्बर्टन ग्रीनस्टोन बेल्ट ही सुमारे ३.६ अब्ज वर्षांपूर्वीची खडकांनी बनलेली पर्वतरांग आहे. १८७५ मध्ये दक्षिण आफ्रिकेतील सोन्याच्या पहिल्या शोधाचे ठिकाण म्हणूनही ही पर्वतश्रेणी उल्लेखनीय आहे. माखोंजवा पर्वताचा सर्वोच्च बिंदू समुद्रसपाटीपासून अंदाजे १८०० मीटर उंच आहे.

या पर्वतश्रेणीला 'जीवनाची उत्पत्ती' असेही संबोधले जाते, कारण तिच्या भूगर्भशास्त्रात पृथ्वीवरील सर्वोत्तम संरक्षित प्राचीन अचियान खडकांचा समावेश आहे. या प्राचीन खडकांमध्ये पृथ्वीवरील सर्वात जुने जीवसृष्टी, जीवाणू मायक्रोफॉसिल्स, तसेच आपल्या चंद्राच्या निर्मितीशी संबंधित असलेल्या उल्कापिंडाच्या प्रभावाचा पुरावा आहे.

पृथ्वीचा भूवैज्ञानिक इतिहास समजून घेण्यासाठी प्राचीन पर्वतांचा अभ्यास करणे महत्त्वाचे आहे. प्राचीन पर्वत असे सूचित करतात की, प्लेट टेक्टोनिक्स अब्जावधी वर्षांपासून फिरत आहेत. या पर्वतरांगांचा अभ्यास केल्याने भूतकाळातील हवामान आणि वातावरणीय परिस्थितींबद्दल माहिती मिळू शकते, कारण त्यांच्या खडकांमध्ये या सर्व गोष्टींची नोंद आहे! ही माहिती पृथ्वीवरील जीवनाची उत्क्रांती आणि जटील जीवन स्वरूपाच्या विकासास संधी देणारी परिस्थिती समजून घेण्यासाठी महत्त्वपूर्ण आहे. भूतकाळातील नामशेष होण्याच्या घटना आणि भूतकाळात पृथ्वीचे हवामानातील बदलदेखील समजतात.

स्थानिक आणि जागतिक हवामान पद्धतींना आकार देण्यात पर्वत महत्त्वाची भूमिका बजावतात. ते अडथळे म्हणून काम करतात. हवेच्या प्रचंड झोतांची हालचाल रोखतात किंवा मंद करतात. यामुळे पर्वतरांगांच्या दोन्ही बाजूला विविध हवामान परिस्थिती निर्माण होऊ शकते. उदाहरणार्थ, जेव्हा हवेला पर्वताच्या एका बाजूने वाढण्यास भाग पाडले जाते, तेव्हा ती थंड होऊन आणि पाण्याची वाफ पाण्याच्या थेंबामध्ये घनरूप होते आणि पाऊस पडतो. पर्वत नसते तर आतापर्यंत हा पाउस वाहून पुढे गेला असता. परिणामी पॅसिफिक वायव्य, दक्षिण चिली, स्कॉटलँड आणि जपान यांसारख्या प्रदेशांमध्ये पर्वत नसते तर जितका पाउस पडला असता, त्यापेक्षा जास्त पाऊस पडला असता. पर्वत हवेच्या झोतांचा ओलावा कमी करतात. पर्वतांच्या खालचे प्रदेश शुष्क असतात. उदाहरणांमध्ये नेवाडा, युटाहचा बराचसा भाग आणि युनायटेड स्टेट्समधील पूर्व ओरेगॉन यांचा समावेश आहे. पर्वत नसते तर तापमान आणि पर्जन्यमानात कमी फरक राहिला असता आणि जागतिक हवामान शैली अधिकतर एकसमान राहिली असती.

जरी पृथ्वीच्या भौगोलिक क्षेत्रांपैकी फक्त २५ टक्के पर्वत असले तरीही ते जगातील ८५ टक्क्यांहून अधिक उभयचर, पक्षी आणि सस्तन प्राण्यांच्या प्रजातींकरीता आसरा आहेत. त्यापैकी अनेक प्रजाती अद्वितीय आहेत. प्राचीन पर्वतांना त्यांच्यामध्ये राहणाऱ्या स्थानिक समुदायांसाठी सांस्कृतिक आणि आध्यात्मिक महत्त्व आहे. काही शिखरांवर पवित्र स्थाने अस्तित्वात आहेत. जसे, उत्तर थायलंडमधील चियांग माईजवळ डोई सुथेप. आपल्याकडे तर अशी असंख्य उदाहरणे आहेत, जसे सप्तशृंगी. बौद्ध, ज्यू आणि ख्रिश्चन परंपरांसाठी काही पर्वतांना धार्मिक महत्त्व आहे. प्राचीन पर्वतांची निर्मिती आणि इतिहास समजून घेणे वर्तमान टेक्टोनिक क्रिया आणि भविष्यातील पर्वतांच्या संभाव्य निर्मितीचा अभ्यास करण्यास मदत करते. जेव्हा आपण पर्वतांचा विचार करतो, तेव्हा आपण त्यांना आपल्या भूदृश्यांचे स्थिर, टिकाऊ घटक म्हणून पाहतो. भूगर्भशास्त्र मात्र हे खरे नसल्याचे दाखवते. आपल्या ग्रहाचे खडकाळ कवच बनवणाऱ्या टेक्टोनिक प्लेट्स सतत हलत असतात, ज्यामुळे आपल्या जगाच्या पृष्ठभागावर बदल होत असतात.

प्राचीन पर्वतरांगांचा आणखी एक महत्त्वाचा पैलू म्हणजे त्यांची खनिज संपत्ती. ही संसाधने पर्वतांच्या निर्मितीदरम्यान तयार होतात आणि त्यांना आर्थिक आणि सामाजिक महत्त्व असते. बार्बर्टन ग्रीनस्टोन बेल्ट सोन्याच्या साठ्यांसाठी ओळखला जातो. तर अरावली पर्वतरांगा तांबे, शिसे आणि जस्त याने समृद्ध आहेत. प्राचीन पर्वतरांगांचा अभ्यास केल्याने आधुनिक समाजासाठी आवश्यक असलेल्या खनिज संसाधनांचा शोधदेखील होऊ शकतो.

त्यांच्या सर्वोच्च शिखरांपासून खोल दऱ्यांपर्यंत पर्वतदेखील बर्फ, झरे, नद्या आणि पर्वतीय जलचरांच्या रूपात पाण्याचा साठा म्हणून काम करतात. पर्वतामधून वितळणारे पाणी, प्रवाह आणि इतर गोड्या पाण्याचे स्रोत जगातील ६० ते ८० टक्के गोड्या पाण्याचा पुरवठा करतात. जगाची किमान ५० टक्के लोकसंख्या अन्न, स्वच्छ ऊर्जा आणि पाण्यासह जगण्यासाठी पर्वतीय परिसंस्थांवर अवलंबून आहे.

प्राचीन पर्वतरांगांचा अभ्यास करणे हे भूशास्त्रातील आवश्यक आणि आकर्षक क्षेत्र आहे. पृथ्वीवरील सर्वात जुने पर्वत, जसे की बार्बर्टन ग्रीनस्टोन बेल्ट, त्याच्या भूगर्भशास्त्रीय इतिहासात मौल्यवान अंतर्दृष्टी प्रदान करतात आणि जीवनावर महत्त्वपूर्ण परिणाम आहेत. प्राचीन पर्वतरांगा त्यांच्या खनिज स्रोतांमुळे खूप आर्थिक आणि सामाजिक दृष्टीने महत्त्वाच्या आहेत. पृथ्वीचा भूगर्भशास्त्रीय भूतकाळ समजून घेण्यासाठी आणि भविष्यातील टेक्टोनिक क्रियांचा अंदाज घेण्यासाठी प्राचीन पर्वतांची निर्मिती आणि इतिहास समजून घेणे महत्त्वाचे आहे.

# उकडवून स्वादिष्ट कॉर्न बॉल्स बनवा

स्वीट कॉर्नपासून अनेक प्रकारचे पदार्थ बनवता येतात. लोकांना भुट्टा देखील आवडतो आणि तो आरोग्यासाठी देखील फायदेशीर ठरू शकतो. स्वीट कॉर्न चवीला काहीसा गोड असतो. ते उकडवून खाऊ शकता किंवा काही स्नॅक्स देखील बनवू शकता. थाई स्वीट कॉर्न रेसिपी देखील बनवू शकता. ही रेसिपी करायला खूप सोपी आहे. चला तर मग साहित्य आणि कृती जाणून घेऊ या.

**साहित्य :** कणीस, लेमन ग्रास (लेमन ग्रासचे भारतीय नाव), लिंबाचा रस, बेकिंग पावडर, काळी मिरी, करी पेस्ट, नारळ पावडर, कॉर्न फ्लोअर आणि मीठ.


**पाककृती :** वाफवलेले कॉर्न बॉल्स बनवण्यासाठी कॉर्न पाच मिनिटे उकडवा. आता कॉर्नमधील पाणी पिळून घ्या. नंतर उकडलेले कॉर्न ग्राइंडरमध्ये बारीक करून पेस्ट तयार करा. या कॉर्न पेस्टमध्ये नारळाची दूध पावडर, चिरलेला लेमनग्रास, लिंबाचा रस, हिरवी करी पेस्ट, कॉर्नफ्लोअर, बेकिंग पावडर, काळी मिरी पावडर आणि मीठ घाला.

सर्व साहित्य चांगले मिसळा आणि या मिश्रणाचे छोटे गोळे बनवा. कॉर्न बॉल्स स्टीमरमध्ये १०-१२ मिनिटे शिजवा. स्टीम कॉर्न बॉल्स तयार आहेत. चटणीसोबत सर्व्ह करा.



# या '3' घरगुती फ्रूट मास्कने करा सनटॅनच्या समस्येला अलविदा!

उन्हात काळवंडलेली त्वचा पुन्हा तजेलदार करण्यासाठी ब्युटीपार्लरच्या ट्रीटमेंटपेक्षा करा हे घरगुती उपाय. वीकेंडला घरच्या घरी काही फळांच्या मदतीने त्वचा (exfoliate) मोकळी करून सौंदर्य खुलवण्यासाठी कॉस्मोलॉजिस्ट यांनी सुचवलेले हे काही उपाय नक्की अजामावून



### कलिंगड आणि काकडीचा मास्क

कलिंगडामध्ये पाण्याचा अंश अधिक असतो. त्यामुळे त्वचा मऊ आणि तजेलदार राहण्यास मदत होते. काकडीमध्ये पाणी मुबलक असल्याप्रमाणेच ब्लिचिंग क्षमताही आढळते. यामुळे टॅन कमी करण्यास आणि त्वचेचा रंग हलका करण्यास मदत होते.

**कसा बनवाल**

- कलिंगड आणि काकडीचा पल्प एकत्र करा. तयार मिश्रण चेहऱ्यावर लावा.
- १० मिनिटांनंतर चेहरा थंड पाण्याने स्वच्छ करा.

### पीच आणि टोमॅटोचा मास्क

पीचमध्ये पोटॅशियम, मॅग्नेशियम आणि व्हिटॅमिन सी मुबलक प्रमाणात आढळते. यामुळे त्वचेचे पोषण होते. पीचमधील मॉईश्चरायझिंग घटक आणि टोमॅटोमधील क्लिन्जिंक करण्याचे गुणधर्म त्वचेला अधिक तजेलदार बनवते.

**कसा कराल हा पॅक**

- एक पीच आणि टोमॅटो यांची एकत्र पेस्ट करावी.
- यामध्ये एक चमचाभर मध मिसळा.
- तयार मिश्रण चेहऱ्यावर लावावे. त्यानंतर अर्ध्या तासाने चेहरा कोमट पाण्याने स्वच्छ धुवा.
- अशा घरगुती मास्कचा नियमित आणि योग्य पद्धतीने वापर केल्यास त्वचा अधिक तजेलदार होण्यास मदत होते. टॅन काढण्यासोबतच सौंदर्य खुलवण्यास या मास्कचा उपयोग होतो.

### ॲव्हॅकॅडो आणि पपई

ॲव्हॅकॅडोमध्ये व्हिटॅमिन ई घटक मुबलक असल्याने त्वचा आरोग्यदायी राहण्यास तसेच उजळण्यास मदत होते. पपई टॅन कमी करण्यास मदत करते. तसेच व्हिटॅमिन ए घटक त्वचेला पोषण देतात.

**कसा बनवाल मास्क**

- एका मोठ्या वाटीमध्ये चार टीस्पून ॲव्हॅकॅडोची पेस्ट आणि पपईची पेस्ट मिसळा.
- त्यामध्ये १ टीस्पून बदामाचे तेल आणि ३-४ थेंब ylang-ylang essential oil मिसळा.
- या पॅकने चेहऱ्यावर आणि मानेवर मसाज करा. हा मास्क ५-१० मिनिटे ठेवा.
- त्यानंतर थंड पाण्याने चेहरा स्वच्छ धुवा. थोड्या वेळाने चेहरा सुती कापडाने कोरडा करा. त्यानंतर चेहऱ्यावर मॉईश्चरायझर लावा.
- हा उपाय नियमित करा.



# केवळ स्वाद नव्हे तर गुणांनीही परिपूर्ण उसाचा रस

**उन्हाळ्याची** काहिली आता चांगलीच जाणवू लागली आहे आणि त्यामुळे साहजिकच लोकांची पावले आईस्क्रीम पार्लर, थंड पेये विकणाऱ्या दुकानांकडे वळू लागली आहेत. त्यातच उसाच्या गुऱ्हाळांनी म्हणजे रसवंतीगृहांनी त्यांचे संसार सुरू केले असून थंडगार, स्वादिष्ट आणि आले-लिंबू घालून केलेला गारेगार रस पिण्यासाठी गर्दी होऊ लागली आहे.



उसापासून मिळणारा हा नैसर्गिक रस केवळ स्वादिष्टच नाही तर आरोग्यासाठी खूपच फायदेशीर आहे. अँटीऑक्सिडंटनी समृद्ध असा हा रस रोगप्रतिकारक शक्ती वाढविणारा आहे. आयर्न, मॅग्नेशियम, कॅल्शियम व अन्य इलेक्ट्रोलाईट्सचे प्रमाण या रसात पुरेसे असते, त्यामुळे डीहायड्रेशन झालेल्यांना रस पिणे फार उपयुक्त ठरते. सर्वसामान्य सर्दी आणि अन्य किरकोळ साथीचे आजार रोखण्यास रस पिणे फायद्याचे आहे तसेच ताप उतरवण्यासाठी सुद्धा रस पिण्याचा उपयोग होतो कारण उसाचा रस शरीरात प्रोटीनची पातळी वाढवितो.

उसाच्या रसात कर्बोदके, प्रथिने, शिवाय आयर्न, पोटॅशियम अधिक मात्रेत असते यामुळे एक ग्लास उसाचा रस शरीरातील ऊर्जेची पातळी वाढवितो आणि शरीराचा थकवा दूर करतो. रक्तातील प्लाझ्मा आणि अन्य तरल पदार्थ वाढवितो. मूत्रपिंडाच्या विकारात म्हणजे किडनी स्टोनमध्ये रस पिणे फायद्याचे आहे. तसेच हा रस दात किडणे आणि श्वास दुर्गंधी रोखणारा आहे. यकृत म्हणजे लिव्हरला बळ देणारा असल्याने कावीळ झाल्यास उसाचा रस द्यावा, असे सांगितले जाते. आयुर्वेदानुसार उसाच्या रसाचे सेवन बद्धकोष्ठता दूर करणारे आहे आणि रसात असलेल्या क्षारांमुळे पित्त, पोटातील जळजळ दूर होते. उसाच्या रसात ए तसेच सर्व प्रकारची बी व्हिटॅमिन्स असतात, म्हणूनही उसाचा रस आरोग्यवर्धक ठरतो. फक्त रसवंतीगृहात रस पिताना उघड्यावरच बर्फ घालणे टाळावे तसेच रसवंतीगृहाची तेथील ग्लास, रस पिळणारे चरक यांची स्वच्छता आहे याची खात्री करून घ्यावी.

# ग्रीन कॉफीदेखील आरोग्यासाठी लाभदायक

**सकाळी** उठल्यावर वाफाळत्या कॉफीचा कप कोणाला नकोसा असेल? विशेषतः थंडीमध्ये किंवा पावसाच्या दिवसांमध्ये कॉफी मिळाली की मोसमाचा आनंद आणखीनच वाढतो, आणि शरीराची मरगळ दूर होऊन शरीरामध्ये नवे चैतन्य येते. पण केवळ शरीराची मरगळ दूर करणे आणि शरीरामध्ये चैतन्य निर्माण करणे एवढ्यापुरताच कॉफीचा उपयोग नाही. कॉफीचे सेवन आपल्या आरोग्याच्या दृष्टीने देखील फायद्याचे ठरण्यासाठी ग्रीन टीप्रमाणेच ग्रीन कॉफीचे सेवन करणे गरजेचे आहे. कॉफीच्या बिया भाजण्याच्या आधी हिरव्या असतात. याच बियांपासून तयार केली गेलेली कॉफी आरोग्यासाठी उपयुक्त असल्याचे आहारतज्ज्ञ म्हणतात. ही कॉफी आरोग्याच्या दृष्टीने कशाप्रकारे उपयोगी आहे हे जाणून घेऊ या.

ग्रीन कॉफीमध्ये कॅफीनचे प्रमाण कमी असते. तसेच यामध्ये असलेले क्लोरोजेनिक ॲसिड वजन घटविण्यास सहाय्यक आहे. या तत्त्वामुळे शरीराच्या चयापचय शक्तीला चालना मिळत असून, शरीरातील ब्लड शुगर लेव्हल नियंत्रित राहण्यास मदत होते. शरीरातील साठून राहिलेले ग्लुकोज आणि चरबीचे प्रमाण या कॉफीच्या सेवनाने कमी होऊ लागते. त्यामुळेच संतुलित आहार आणि नियमित व्यायाम यांच्या जोडीने ग्रीन कॉफीचे सेवन वजन घटविण्याच्या दृष्टीने फायद्याचे ठरते. क्लोरोजेनिक ॲसिडमध्ये पोटॅशियमचे प्रमाण जास्त असून यामध्ये सोडियमचे प्रमाण कमी असते. यामुळे रक्तदाब नियंत्रित राहण्यास मदत होते. त्याचप्रमाणे ग्रीन कॉफीच्या बिया कच्च्या आणि कोणत्याही प्रक्रिया केलेल्या नसल्यामुळे यांच्यामध्ये अँटी ऑक्सिडंट्सचे प्रमाण अधिक असते. म्हणूनच ग्रीन कॉफीच्या सेवनाने शरीरावर हानीकारक फ्री रॅडिकल्सचा प्रभाव कमी होतो. तसेच ग्रीन कॉफीमध्ये असणारे राहिडिक ॲसिड त्वचेला आर्द्रता प्रदान करणारे आहे.




# पासवर्ड आठवतच नाहीये? काळजी नको, पासवर्डशिवाय अनलॉक करा मोबाईल, पाहा ट्रिक्स

सुरक्षिततेच्या दृष्टीने प्रत्येकजण स्मार्टफोनला लॉक ठेवतो. फोनमध्ये अनेक वैयक्तिक आणि महत्त्वाच्या गोष्टी सेव्ह असतात. या गोष्टी कोणी पाहू नयेत, अशी युजर्सची इच्छा असते. यामुळेच मोबाईल लॉक करणे ही पर्यायापेक्षा गरज बनली आहे. पण जर तुम्ही तुमचा पासकोड विसरलात तर? तुमचा सर्व डेटा देखील करप्ट होऊ शकतो. विसरलेला पासकोड परत मिळवणे अनेकांसाठी कठीण असते. ही समस्या तुम्ही आधीच सोडवली तर बरे. आज आम्ही तुम्हाला अशा पद्धतीबद्दल सांगत आहोत, ज्याद्वारे तुम्ही पासवर्ड न टाकता तुमचा फोन अनलॉक करू शकता. परंतु, पिन किंवा पासवर्ड सेट करण्यापूर्वी तुम्हाला ही पद्धत करावी लागेल.

**स्मार्ट लॉकसह अनलॉक करा :** हे एक अँड्रॉईड फीचर आहे, जे तुम्हाला काही विशिष्ट परिस्थितींमध्ये लॉक स्क्रीन सुरक्षिततेला बायपास करण्याची परवानगी देते. यासाठी तुम्हाला सेटिंगमध्ये जाऊन सिक्युरिटीमध्ये जावे लागेल. यानंतर तुम्हाला स्मार्ट लॉकमध्ये जावे लागेल. तो तुमचा फोन लॉक लक्षात ठेवेल. पिन सेट करण्यापूर्वी हे करणे आवश्यक असेल.

**ऑन-बॉडी डिटेक्शन :** येथे तुम्हाला ऑन-बॉडी डिटेक्शनसह पासवर्डशिवाय तुमचे विद्यमान लॉक



अनलॉक करण्यासाठी ५ पर्याय दिले जातील. यामध्ये तुम्ही फोन हातात घेतला आहे की नाही हे फोनला कळेल. फोन तुमच्या हातात किंवा खिशात असल्यास फोन आपोआप अनलॉक होईल.

**विश्वसनीय ठिकाणे :** तुमचा फोन आपोआप अनलॉक होईल असे स्थान तुम्ही निवडू शकता.

**विश्वसनीय उपकरणे :** विश्वासार्ह फिटनेस ट्रॅकर किंवा कारसारख्या अन्य ब्लूटूथ उपकरणाशी कनेक्ट केल्यावर तुमचा फोन आपोआप अनलॉक होईल.

**विश्वासार्ह चेहरा :** फोन अनलॉक करण्यासाठी फेशियल रेकग्निशन वापरा.

**व्हॉइस मॅच :** तुमचा फोन तुमचा आवाज ओळखताच, तो तुमचा फोन अनलॉक करेल. हे वैशिष्ट्य अँड्राइड ८ ओरियो नंतर बंद करण्यात आले होते परंतु ते अद्याप जुन्या उपकरणांवर काम करते.

# बिटाच्या अतिसेवनाने होऊ शकतात दुष्परिणाम


**बीट** ही भाजी शरीराच्या आरोग्याच्या दृष्टीने अतिशय चांगली समजली जाते. पण आरोग्याच्या दृष्टीने एखादा पदार्थ कितीही चांगला असला, तरी त्याच्या अतिसेवनाने दुष्परिणाम उद्भवू शकतात. बिटाच्या अतिसेवनाने देखील शरीरावर काही दुष्परिणाम दिसून येण्याची शक्यता असते. हे दुष्परिणाम कोणते आहेत, ते जाणून घेऊ या. बिटाच्या अतिसेवनाने 'गाऊट' किंवा किडनी स्टोन्स सारख्या समस्या उद्भवण्याची शक्यता असते. तसेच बिटाच्या रसाच्या अतिसेवनाने शरीरामध्ये लोह, कॉपर, मॅग्नेशियम, लिव्हरमध्ये साठत राहून त्यामुळेही समस्या उद्भवू शकतात.

बिटाच्या अतिसेवनामुळे 'बीट-युरिया' दिसून येण्याची शक्यता असते. लघवीचा सामान्य रंग बदलून तो बिटाप्रमाणे लालसर होणे हे बीट-युरियाचे लक्षण आहे. तसेच ज्या व्यक्तीच्या शरीरामध्ये लोहाची कमतरता असेल, त्यांच्या बाबतीत ही समस्या अधिक उद्भवते. ही समस्या फारशी गंभीर नसली, तरी यासाठी डॉक्टरांचा सल्ला घेणे आवश्यक आहे. बिटामध्ये 'ऑक्सलेट' मुबलक मात्रेमध्ये असून यांच्या अतिसेवनाने किडनी स्टोन्स होण्याची शक्यता असते. म्हणून ज्या व्यक्तींमध्ये आधीपासूनच किडनी स्टोन्सची समस्या असते, त्यांना बीट आहारातून कमी करण्याचा सल्ला दिला जातो. तसेच ज्यांना 'गाऊट' हा विकार असेल, त्यांनाही बीट आहारातून वर्ज्य करण्याचा सल्ला दिला जातो.



बिटाच्या अतिसेवनाचे आणखी एक लक्षण म्हणजे शरीरावर येणारे बारीक पुरळ. हे लक्षण सामान्य नसून, अतिशय अभावानेच आढळते. बिटाच्या अतिसेवनाने अंगावर बारीक पुरळ उठणे, शरीरावर लालसर चट्टे उठणे, खाज सुटणे, आणि क्वचित थंडी वाजून ताप येणे अशी लक्षणेही पाहिली गेली आहेत. त्याचप्रमाणे बिटाचे सेवन केल्यानंतर आवाज बसण्याची समस्या दुर्मिळ असली, तरी पाहिली गेली आहे. बिटाच्या अतिसेवनाने पोटामध्ये गॅसेस होऊन पोटदुखी उद्भवू शकते. तसेच पोट फुगणे, बद्धकोष्ठ याही समस्या बिटाच्या अतिसेवनाने उद्भवू शकतात.

# उन्हाळ्यात केसांना अधिक चमकदार ठेवतील या '५' टीप्स



उन्हाळ्याच्या दिवसांत घामामुळे डोक्याला खाज येणं, केसात कोंडा वाढणं हा त्रास हमखास आढळतो. उन्हाळ्यात त्वचेची, आरोग्याची काळजी घेतली जाते. पण केसांकडे फारसे लक्ष दिले जात नाही. परिणामी अनेक छुपे त्रास किंवा त्वचा विकार वाढण्याची शक्यता असते. म्हणूनच शुष्क आणि फ्रिझी केसांची नेमकी काळजी कशी घ्यावी दिलेला हा सल्ला नक्की जाणून घ्या.

**उन्हाळ्याच्या** दिवसात वातावरणातील उष्णता आणि आर्द्रता यामध्ये बदल होत असल्याने केस अधिक शुष्क होतात. उन्हाळ्याच्या दिवसात घाम येण्याचं प्रमाण अधिक वाढतं. त्यामुळे टाळूजवळील त्वचा अधिक चिकट होते. त्याचा परिणाम केसांवरही जाणवतो.

- उन्हाळ्याच्या दिवसात किमान २-३ वेळा केस स्वच्छ धुवावेत. नियमित केस धुणे शक्य नसेल तर एक आड एक दिवस केस स्वच्छ धुवावेत. यामुळे केस चिकट होणार नाहीत.
- केस धुण्यासाठी माईल्ड किंवा हर्बल शाम्पू वापरा. केमिकलयुक्त शाम्पूमुळे केसांचे अधिक नुकसान होते. तुम्हांला डॅण्डरफचा त्रास असेल तर ॲण्टी डॅण्डरफ शाम्पू वापरा.
- शाम्पूने केस धुतल्यानंतर चांगल्या दर्जाचे कंडिशनरही वापरा. टाळूवर कंडिशनर लावू नका. शक्य असेल तर लिव इन कंडिशनर वापरा. यामुळे सूर्याच्या प्रखर किरणांप्रमाणेच प्रदूषणामुळे केसांचे होणारे नुकसान टाळण्यासही मदत होते.
- उन्हाळ्याच्या दिवसात केसांची चमक आणि पोत सुधारण्यासाठी ॲप्पल सायडर व्हिनेगर फायदेशीर ठरते. या घरगुती उपायासाठी दोन टीस्पून ॲप्पल सायडर व्हिनेगर एक लिटर पाण्यामध्ये मिसळा. केस शाम्पूने धुतल्यानंतर केस या पाण्यानेही स्वच्छ धुवा.
- तुमचे केस मोकळे सोडणार असाल तर सनस्क्रीनयुक्त हेअर कंडिशनर आणि सेरम वापरा. यामुळे घामाने केस चिकचिकीत होण्याची शक्यता कमी होते. यामुळे केस रफ आणि विस्कटलेले दिसण्याची शक्यता कमी होते.





# बद्धकोष्ठ दूर करण्याकरिता प्या मूग आणि पालकाचे सूप

**आपल्या** भोजनाच्या सवयी, आपला आहार आणि आपल्या शरीराला दिवसभरामध्ये होत असणारा व्यायाम, हालचाल, या गोष्टींवर आपण खात असलेल्या अन्नाचे पचन मोठ्या प्रमाणात अवलंबून असते. जर पचनक्रिया सुरळीत नसेल, तर अपचन, बद्धकोष्ठासारख्या समस्या उद्भवतात. जर तुम्हालाही या समस्यांना वारंवार तोंड द्यावे लागत असेल, तर आहारामध्ये थोडा फार बदल करण्याची आवश्यकता आहे असे समजण्यास हरकत नाही. जर बद्धकोष्ठाचा त्रास होत असेल, तर आपल्या आहारामध्ये मुख्यत्वे फायबरची मात्रा जास्त असलेल्या पदार्थांचे सेवन करणे आवश्यक आहे. याच अंतर्गत आणि सध्याच्या थंडीच्या मोसमामध्ये सर्वांना नक्कीच आवडेल अश्या मूग आणि पालक सूपचा समावेश आहारामध्ये करता येईल. हे सूप पचण्यास कठीण नसून, यामध्ये शरीरासाठी आवश्यक सर्व पोषक तत्वे आहेतच, त्याच्याच जोडीने पचनासाठी आवश्यक फायबरही या सूपद्वारे शरीराला मिळू शकते. हे सूप बनवण्यासाठी एक कप हिरवे मूग पाण्यामध्ये रात्रभर भिजत घालून ठेवावेत. दुसऱ्या दिवशी सकाळी मूग पाण्यातून उपसून स्वच्छ धुवून घ्यावेत आणि प्रेशर कुकरमध्ये मऊ शिजवून घ्यावेत. एका भांड्यामध्ये थोडेसे तेल किंव साजूक तूप घालून त्यामध्ये एक चिरलेला कांदा, पालकाची पाने (दीड कप), थोडे आले, लसूणाच्या पाच सहा पाकळ्या, हळद आणि पाव चमचा कुटून घेतलेले धणे घालवेत. त्यानंतर यामध्ये आवडत असल्यास गाजराचे तुकडे, फ्लॉवरचे तुकडे, आणि थोडासा पुदिना घालून चांगले परतावे. भाज्या चांगल्या शिजल्या की शिजवून घेतलेले मूग यामध्ये घालून चांगले परतावेत. त्यानंतर गॅस बंद करून हे मिश्रण थंड होऊ द्यावे. मिश्रण थंड झाल्यानंतर थोडेसे पाणी घालून हे मिश्रण मिक्सरवर बारीक वाटून घ्यावे व चाळणीतून किंवा मोठ्या गाळणीतून गाळून घेऊन भाज्यांचा चोथा वेगळा करावा. गाळून घेतलेल्या मिश्रणामध्ये आवश्यक तेवढे पाणी घालून चवीपुरते मीठ आणि काळ्या मिऱ्याची पूड घालावी. सूपला चांगली उकळी आल्यानंतर गॅस बंद करावा.

मूग आणि पालक यांमध्ये फायबरची मात्र जास्त असून, मूगामध्ये पोटॅशियमदेखील मुबलक प्रमाणात असते. पालकामध्ये ही जीवनसत्वे, फायबर आणि लोह यांची मात्रा मुबलक असते.



# व्यायामासाठी वापरण्यात येणाऱ्या कपड्यांमधून घामाची दुर्गंधी अशी करा दूर

व्यायाम करीत असताना पुष्कळ घाम येत असतो. अंगावरील कपड्यांमध्ये हा घाम शोषून घेतला जात असतो. अंगावरील कपडे घामाने ओले झाले असता, त्यामध्ये व्यायाम सुरू ठेवणे अडचणीचे होऊ लागते. ही अडचण दूर करीत व्यायाम करताना घाम शोषून घेण्यासाठी आणि चटकन वाळण्यासाठी आजकाल 'ड्राय फिट' पद्धतीचे कपडे खास व्यायामप्रेमी मंडळींसाठी तयार करण्यात येत असतात. व्यायाम करताना वापरण्यात येणाऱ्या कपड्यांमुळे शरीरावरील घाम जरी शोषून घेतला जात असला, तरी अनेकदा या कपड्यांमधील घामाची दुर्गंधी मात्र कपडे धुतल्यानंतरही हटत नाही. ही दुर्गंधी दूर करण्यासाठी काही उपायांचा अवलंब करता येऊ शकेल.

**आजकाल** व्यायामासाठी खास बनवण्यात येणाऱ्या कपड्यांमध्ये अतिशय सूक्ष्म छिद्रे असतात. पण शरीरावरील घाम, बाहेरील वातावरणातील प्रदूषण, किंवा धुळीचे कण, त्वचेचा तेलकटपणा, कपडे धुण्यासाठी वापरण्यात येणारे डिटर्जंट इत्यादी कपड्यातून व्यवस्थित साफ न झाल्याने याचे कण या सूक्ष्म छिद्रांमध्ये अडकून राहतात आणि त्यामुळे कपडा धुतल्यानंतर त्यातून विशिष्ट दुर्गंधी येत राहते. ही दुर्गंधी हटवण्यासाठी सर्वप्रथम व्यायाम करून झाल्यानंतर जर कपडे घामाने थोडेच ओले झाले असतील, तर हे कपडे आधी हवेवर चांगले वाळू द्यावेत. कपडे धुण्यासाठी अधिक साबण वापरला तर कपडे अधिक स्वच्छ होतात हा गैरसमज आहे. वास्तविक प्रत्येक पद्धतीचा कपडा ठरावीक साबणाच्या मात्रेने स्वच्छ होणारा असतो. तसेच कपडे मशीनमध्ये धुण्यासाठी वॉशिंग देखील ठरावीक प्रमाणातच साबण वापरला जाणे आवश्यक असते. त्यामुळे यापेक्षा अधिक साबण वापरला गेल्यास कपडे खळबळून धुवूनही हा साबण त्यातून पूर्णपणे निघत नाही. कपड्यातील साबण पूर्णपणे काढून न टाकताच कपडा वाळवला गेला तर यामुळेही कपड्यामध्ये दुर्गंधी येऊ लागते. त्यामुळे साबणाचा आवश्यक तितकाच वापर केला जाणे आवश्यक आहे.



व्यायामाचे कपडे धुण्यासाठी 'फॅब्रिक सॉफनर'चा वापर करू नये. कपडे साबणाने धुतल्यानंतर ते न आकसता मुलायम आणि सुगंधी राहावेत याकरिता फॅब्रिक सॉफनरचा वापर करण्यात येतो. पण याचा वापर व्यायामासाठी वापरण्यात येणाऱ्या कपड्यांसाठी केला असता, यामुळे कपड्यावरील सूक्ष्म छिद्रे बुजण्याची शक्यता असते. जर ही छिद्रे बुजली, तर कपडा स्वच्छ होत नाही आणि त्यातून दुर्गंधी येऊ लागते. त्याचप्रमाणे सॉफनरच्या वापराने कपड्याचा आकार आणि फिट बिघडण्याची देखील शक्यता असते. जर व्यायामाचे कपडे घामाने भिजून खूपच ओले झाले असतील तर मात्र हे कपडे हवेवर वाळू न देता त्वरित धुणे योग्य ठरते. कपडे धुण्यापूर्वी ते उलटे करावेत, यामुळे तुमच्या त्वचेच्या संपर्कात आलेला कपड्याचा भाग व्यवस्थित धुतला जातो. व्यायामाचे कपडे शक्यतो इतर कपड्यांच्या जोडीने धुणे टाळावे. तसेच हे कपडे धुताना पाण्यामध्ये थोडे व्हिनेगर घालून कपडे धुवावेत. व्हिनेगरमुळे कपड्यांमधील दुर्गंधी पूर्णपणे दूर होते. व्हिनेरगरचा वापर करायचा असल्यास आधी एका बादलीमध्ये चार भाग पाणी आणि एक भाग व्हिनेगरमध्ये कपडे भिजवून ठेवावेत आणि मग नेहमीप्रमाणे धुवावेत. कपडे धुतल्यानंतर हवेशीर ठिकाणी वाळवावेत. त्यामुळे कपड्यामधील दुर्गंधी नाहीशी होईल.


हे साप्ताहिक मालक, मुद्रक, प्रकाशक – दिपक मोरेश्वर नाईक यांनी सोमानी प्रिंटिंग प्रेस, गाल नं. १, एन. के. इंडस्ट्रीया इस्टेट, प्रवासी इंडस्ट्रीयल इस्टेटच्या बाजूला, गेट नं. २, गोरेगांव (पूर्व), मुंबई – 400 063 येथे छापून २, राजाराम को. ऑ.हौ.सो. बंदरवाडी, नवघररोड, शनी मंदिराजवळ, भाईंदर (पूर्व), ठाणे – 401 105 येथे प्रकाशित केले. (सर्व वाद ठाणे न्यायालयाच्या कक्षेत). संपर्क : – 9594418181 / 8424989898